## विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००५ |
| वर्ष | : | सातवे |
| अंक | : | १ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**


**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १००**


MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ

# व्ही. पी. एम्. दिशा



वर्ष सातवे / अंक १ / डिसेंबर २००५



## नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे




वर्ष सातवे / अंक १/ डिसेंबर २००५

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १० वे / अंक ६वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गोष्टींमधून संस्कार करणारे कुटुंब साहित्यिक केंद्र | सौ. सुमेधा बेडेकर | ३ |
| २) | कथाकार भारत सासणे यांचं साहित्य आणि साहित्यसूची | डॉ. प्रदीप कर्णिक | ९ |
| ३) | प्राचीन भारतातील शिक्षण पध्दती | शं. बा. मठ | १८ |
| ४) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधने | यशवंत साने | २८ |
| ५) | अण्णांच्या आठवणींचे 'रंगाळणारे सुगंध' | माधव शिरवळकर | ३४ |
| ६) | परिसर वार्ता | संकलित | ३७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# गोष्टींमधून संस्कार करणारे कुटुंब साहित्यिक केंद्र

*दुसऱ्या महायुद्धानंतर जगभरच कुटुंब संस्थेला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. संस्कारक्षम शिक्षणाची ज्या कुटुंबात पूर्वी सुरुवात होई त्या कुटुंबातील संस्कार क्षमतांबाबत अंतर्मुख करणारे विचार व्यक्त करणारा हा लेख. - संपादक*

१५ मे हा संयुक्त राष्ट्रसंघाने 'जागतिक कुटुंबदिन' म्हणून जाहीर केला आहे. वेगवेगळ्या दिनांच्या जाहीर समारंभाएवढी जागतिक कुटुंबदिनाची मात्र दखल घेतली जात नाही. एवढेच नव्हे तर या दिनाचे औचित्यही हरवून गेल्याचे सध्याचे चित्र आहे. आयुष्यातही खूप महत्त्वाच्या अशा काही गोष्टी आपण कळत-नकळत गृहीत धरतो. अगदी आपण श्वास घेतो तितक्याच सहजतेने 'कुटुंब' गृहीत धरतो. आपले कुटुंब असणे म्हणजे सामान्यत: त्यातील सर्वजण सुखी-समाधानी असणे, सर्वांच्या गरजा पुरवल्या जाणे हे गृहीत धरले जाते. कुटुंब पद्धत भारतीय संस्कृतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. सध्या मात्र ही कुटुंब व्यवस्था खिळखिळी झाल्याचे दिसते. एकीकडे विश्वचि माझे घर म्हणायचे आणि दुसरीकडे माणूस माणसापासून दूर जात चालला आहे असे जाणवते. व्यक्तिस्वातंत्र्याचा मंत्र पुढच्या पिढीने जपताना 'स्वतंत्र संसार' ही संकल्पना प्राधान्याने जोपासायला सुरवात झाली. तडजोड करीत जगण्यापेक्षा स्वत:च्या मनासारखे आयुष्य जगण्याला प्राधान्य दिले जाते. मी, माझं अस्तित्व, माझ्या इच्छा-आकांक्षा या गोष्टी महत्त्वाच्या ठरल्याने कुटुंब ही संकल्पना दुय्यम ठरत आहे. वाढती आत्मकेंद्री वृत्ती व व्यक्ती विकासाच्या काहीशा अतिरेकामुळे विसंवादाचे प्रमाण कौटुंबिक पातळीवर वाढत आहे. या भूमिकेच्या अट्टाहासापायी एकाकी, निराधार, जीवन जगणाऱ्या वृध्दांचे प्रमाण वाढत आहे. अर्थयुगात पैशाला अवास्तव महत्त्व आल्याने माणसे, भावना इ. गोष्टी गौण ठरु लागल्या आणि सुख हे पैशात मोजू जाऊ लागले आणि सर्व परिस्थितीत संस्कार हे महत्त्वाचे न रहाता कुटुंबापेक्षा करिअर, करिअर पेक्षा पुढील भविष्यातील भराऱ्यांना महत्त्व येऊ लागले. नातेसंबंध ही गोष्ट दुय्यम ठरली, नात्यांमधील ताणतणाव वाढताहेत. आजी-आजोबा, काका-काकू अगदी पती-पत्नी हे ही आता विभक्त होऊ पहात आहेत व तेथे साहित्यिक केंद्राला जवळ जवळ कुलुपच लागले म्हटले तरी वावगे होणार नाही.

### अधिकस्य अधिकंफलम्

कुटुंब हे जेवढे विशाल तेवढे हित ही नक्कीच अधिक. कुटुंबामध्ये थोडी तडजोड, जमवून घेणे ही फायदेशीर गुंतवणूक ठरते. ती भरपूर व्याजाने दामदुपटीने परत मिळते. त्याकरिता मी-माझे या कल्पना जाऊन, 'आम्ही आमचे' व्हायला पाहिजे. एक संघ भावनेने एकत्र खेळावे लागते, जेवावे लागते, उठबस करताकरता घर हेच सांस्कृतिक केंद्र होत असते. विविध स्वभावांचे, विचारांचे इंद्रधनुष्य घरांत पडत असते. अगदी महात्मा गांधींपासून ते संतपुरुषांच्या कथा, रामायण - महाभारतातील गोष्टी, दासबोध - ज्ञानेश्वरीसारखे ग्रंथ हे मार्गदर्शक ठरत असत व घरातच सु-कृती म्हणजेच संस्कृतीचे पाठ, संस्काराचे पाठ आपोआप जन्म घेत असत त्याचवेळी जगण्याची कलाही कशी आत्मसात् करावी याचे धडे सहजच घराच्या विद्यापीठात मिळत असत. जीवनाच्या प्रसन्नतेला अनुकूल करणारी कृती म्हणजे कला. ज्ञान, विज्ञान, विचार आत्मसात करण्यासाठी जी मानवी मनांत आनंदवृत्ती निर्माण

करते ती खरी कला लहानपणी आपण कुटुंबात शिकतो. नाती सांभाळायचे काम, हाडामांसाच्या माणसांना जपण्याचे काम प्रथम मुद्दाम पण नंतर सहजतेने व्हायला पाहिजे. म्हणजे आजच्या आपल्या घरातील वागण्यावरून बालकांवर सुसंस्कार घडवून उद्याची विचारवंत, सुसंस्कृत पिढी निर्माण करता येईल हे सामर्थ्य कुटुंबावर अवलंबून आहे. गोष्टींमधून संस्कार करणारी घर असणे हे सामाजिक दृष्ट्याही हिताचे आहे. दिनचर्येच महत्त्व एका ओळीतच पूर्वजानी सांगून ठेवलय.

''लवकर निजे, लवकर उठे, तया ज्ञान, संपत्ती, आरोग्य भेटे।'' लवकर रामप्रहरी उठल्यावर ज्या भूमातेवर, जमिनीवर आपण उभे रहातो तिला नमस्कार करताना म्हणायचे,

**''कराग्रे वसते लक्ष्मी:कर मध्यें सरस्वती,**
**करमूले तु गोविंद:प्रथाते करदर्शनम् ''**

आपल्या हाताच्या पुढच्या भागात म्हणजे बोटांमध्ये लक्ष्मी असते, तळव्यात सरस्वती राहते, तळवा व मनगट यामध्ये विष्णूचा निवास असतो. सकाळी उठल्यावर दोन हातांचे दर्शन घ्यावे व ज्याचेवर आपण उभे रहातो तिला न विसरता दोन्ही हातांनी चांगले, भव्य दिव्य काम व्हावे, हा केवढा मोठा संस्कार, विचार, यांत सांगितला आहे. संध्याकाळी हात पाय धुऊन शुभंकरोति कल्याणम् हे श्लोक म्हणायचे. देव्हाऱ्यासमोरची उदबत्ती, नंदादीप या साऱ्या पवित्र वातावरणाचाही आपलं मन सुंदर घडवण्यात फार मोठा वाटा आहे. प्रार्थना झाल्यावर घरातील मोठ्या मंडळींना नमस्कार करणे. यांत नम्र भावना सहज येते, आजी-आजोबा, घरांतील मोठी माणसं तृप्त होतात. या तृप्तीतूनच आपल्या भाग्याचा अंकुर फुटतो. आजी - आजोबा छान छान गोष्टी सांगतात. संतांचे, पुढाऱ्यांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवतात, गाणी शिकवतात, आणि येथेच साहित्यिक केंद्र निर्माण होते.

उदा. ८ वर्षानंतर जेव्हा मुलांची मुंज होते तेव्हा गुरु 'सूर्याची उपासना' करण्यासाठी गायत्री मंत्र शिकवतात. हा मंत्र म्हणजे सूर्याजवळ त्याच्या तेजाचे मागणे आहे. तुझ्या प्रमाणे आम्हालाही तेजस्वी कर. अशी प्रार्थना असते. या मंत्रात फार मोठी शक्ती आहे त्याने मन, बुद्धी व शरीर चांगले शुद्ध होते. मौजीबंधन संस्कारात गुरु गळ्यात तीन पदरी सुताचे जानवे घालतात. ते कशाचे प्रतीक ? तर आपले जीवन ह्या तीन प्रवाहातून वहात असते. १) ज्ञान २) कर्म आणि ३) भावना. यांचे कर्म नीट चालावे म्हणून त्यांना ब्रह्मगाठीचा अंकुश असतो. '' ॐ भवति भिक्षां देहि '' - स्वावलंबन शिकवण्यासाठी हा मंत्र दिला जातो. चांगल्या कामासाठी दुसऱ्याजवळ मागण्यांत काही कमीपणा नसतो हे मोठे तत्त्व त्यांत सांगितले आहे. शिवाय रक्षणासाठी हातात दंड, स्वतः स्वत:चे रक्षण करण्याचा हेतू त्यामागे असतो. 'मिळवा व शिका' हे तत्त्व त्यात आहे. कष्ट, विनय, स्वावलंबन, चारित्र्य, बल, शक्ती, धैर्य, धृती इ. साठी हा संस्कार असतो. शाश्वत चिरकाल टिकणारी नीतीमूल्ये यात आहेत. संयम, विवेक, मनोबल वाढवणे हा त्यामागील हेतू.

### घरातील संस्कार

अशी सुसंस्कृत शहाणी मुलं घरातच असतात आणि शिक्षण घेताघेता त्यांची जिज्ञासा वाढत जाते, ते बाहेर ज्ञान संपादन करतात, स्पर्धेत उतरतात. प्रेमाचे, साहित्याचे, समर्थांचे मनाचे श्लोक, करुणाष्टके हे आपण त्यांना घरांत शिकवतो, पाठांतर करुन घेतो. संध्या शिकवली जाते, शेवटी स्वत:चा, कुटुंबाचा, राष्ट्राचा, उध्दार कर हेच ध्येय आपण त्यास गाठायला शिकवतो. परंतु हे सर्व संस्कार घरात आई-वडिलांनी, आजी-आजोबांनी थोडे कष्ट किंवा प्रेमाने केले तर आपोआपच घर हे एक साहित्यिक केंद्र होते कारण 'अतिथि देवो भव', छान मित्रांशी संगत ठेवावी, आपले विचार मन प्रसन्न समृद्ध

करावे की ज्यातून आपल्याला आनंद, शांती, समाधान मिळू शकते. परंतु आता सर्वत्र हे चित्र कुटुंबात बघायला मिळते का? का नाही मिळत? मूल पाळणाघरात व आजी-आजोबा वृध्दाश्रमात का असतात? याला कारणीभूत कोण आहे? याचं उत्तर मला वाटते, 'आपणच' आहोत. पहिली चूक आपल्याकडे आहे. मुलांसाठी किंवा एकमेकांसाठी हल्ली आपण वेळ द्यायला तयार असतो का ? मुलांना जन्म दिला, त्यांच्यावर खूप खर्च केला, नोकरमाणसं ठेवली की आपली जबाबदारी संपते का ? मौजीबंधनात काय काय संस्कार अपेक्षित असतात हे आपण बघितले. पूर्वी आपल्याकडे डोहाळी जेवणांपासून कार्यक्रम व्हायचे, छान गाणी म्हटली जायची, पुढील पिढी चांगली निघावी म्हणून कौतुकाने हे कार्यक्रम केले जात. परंतु हल्ली हे कार्यक्रम म्हणजे नुसते पैशाचे प्रदर्शन असते. भरपूर खर्च करावयाचा पण त्यामागील आशयाचा विचार केला जात नाही. घरातच स्तोत्र, संतांच्या कथा, वाचन, खेळ व आजोळी, काका-मामाकडे मुलांना सुट्टीचे पाठवणे हे आता संपत चालले आहे. भरपूर पैसा खर्च करुन एखाद्या कंपनीतर्फे फिरायला पाठवले जाते किंवा सर्व कुटुंबच्या कुटुंब प्रवासास जाते. आता एकमेकांकडे जाण्याची पध्दत जात चालली आहे, कारण आता आजी आजोबाच रहातात आश्रमात. थोडे दिवस सुध्दा सुटीचे एकमेकांकडे रहाण्याने अगदी सकाळी वेळेवर उठावं, स्वत:चे कपडे, पांघरुण आवरावेत त्या गावची माहिती गोळा करावी अशा गोष्टी शिकायला मिळत. परंतु आता एकमेकांकडे जा-या म्हणायला संकोच व आवडतही नाही. वेळही नाही. बाहेरुन आले की हात-पाय धुवावे, कपडे बदलावेत या साध्या गोष्टी हल्ली पाळल्या जात नाही. शिस्त हा प्रकार जाऊन, नको ते लाड म्हणजे 'जेवताना दूरदर्शन बघणे' 'संगणकावर तासनतास खेळ खेळणे' म्हणजे एकप्रकारचे वेडच आहे. अगदी संगीतापासून खेळण्याची, गिर्यारोहणाची आवड असलेली मुले संगणकावर अभ्यास नव्हे तर खेळात रमू लागली आहेत. आवडी, छंद मागे पडले. मुलांना कल्पना विश्वात रमायला आवडतेच. संगणकावरील खेळाचे त्यांना 'व्यसन' लागते, यात वेग असतो, नवीन नवीन प्रकाराने खेळता येते परंतु परदेशात आता त्याचे तोटे दिसायला लागले आहेत. अजून आपल्या घरोघरी संगणक पोचलेत असे नाही, स्वतंत्र बेडरुममध्ये स्वतंत्र संगणक असे अजून सर्रास दिसत नाही. **अजूनही आपल्याकडे कुटुंब व्यवस्था टिकून आहे.** बऱ्यापैकी घरांत मोठ्या माणसांचे लक्ष असते. संगणकीय खेळांचा अतिरेक मुलांना संवेदनाशून्य बनवतोय आणि त्यांच्यातल्या त्रुटी दाखवत त्यांना सत्तेच्या आहारी जगात जगायलाही शिकवतोय. सध्याच्या आपल्या रहाणीमानाचा, शिक्षण पध्दतीचा, स्वैराचार, मनोवृत्ती, भोगवाद या सर्वांचाच विचार करता साहित्यकेंद्र बरेचसे ढळले आहे, असे म्हणावे लागेल.

### 'स्त्री' चे महत्त्व

याला अधिक जबाबदार कोण आहे असा विचार केला तर 'स्त्री' आहे असे म्हणावे लागेल. स्त्री शिक्षणाचे महत्त्व १००% आहे यात वादच नाही. पूर्वीच्या एकत्र कुटुंब पध्दतीमधील स्त्रिया आणि हल्लीच्या आम्ही स्त्रिया यांच्यातील फरक लक्षात घेता भारतीय स्त्रीने सुवर्णमध्य काढावा. शिक्षणाचा नक्कीच फायदा करुन घ्यावा परंतु करिअर करता करता लक्ष्मणरेषा कुठेतरी असावी असे वाटते. आयुष्यात सगळ्याच गोष्टींचा हव्यास धरला तर कुठेच समाधान नाही. पैसा, ज्ञान व समाधान यांची सांगड घालून आपले व आपल्या कुटुंबाचे जीवन समृध्द करावे. हल्लीचे युग हे स्पर्धेचे आहे. पण या स्पर्धेत उतरताना आपण किती बुडायचे हे ठरवले नाही तर आपल्याबरोबर आपले कुटुंबही ग्रासून जाते. घटस्फोट होतात, मुलांच्यात गुन्हेगारी, तब्येती, शिक्षण सर्वांवर परिणाम होतो. **चूल आणि मूल यातच फक्त धन्यता मानावी असे नाही. पण 'चूल आणि मूल' हे करणे सुध्दा अजिबात सोपे आणि**

**कमीपणाचे तर नाहीच नाही.** अगदी सकाळी पूजेपासून ते रात्री झोपताना नमस्कार करेपर्यंत सर्वत्र साहित्य आहेच ना ! तुळशीला पाणी घालतानाच देवीचे श्लोक ते झाडांना पाणी घालेपर्यंत पर्यावरणाचे विचार व गाणी इथे आपोआपच संस्कार, साहित्य येतेच. पण हल्ली या स्पर्धेच्या युगात या साध्या साध्या गोष्टीच होत नाहीत.

पाव संस्कृती व डबा संस्कृती, दूरदर्शन व संगणक संस्कृती, हावरटासारखे पंजाबी, चायनीज, दाक्षिणात्य वगैरे खादाड संस्कृती आली आहे. भोगवाद, चंगळवादाला आपली पिढी बळी पडते आहे. त्यामुळे साधी साधी वाटणारी नितीमूल्येही जोपासली जात नाहीत. स्वत:च्या कुटुंबाचा व राष्ट्रीय भावना यांचा विचार करायलाही हल्ली कुणाला वेळ नाही. कोणालाही एकमेकांच्या बंधनात रहावयास नको आहे, मुक्त विचाराने मुक्त स्वैराचार चालू आहे. नवीन नवीन शोध लागतायत पण सगळ्याचा अतिरेक होतोय.

उदा. पूर्वी घरांत एक फोन असायचा कामापुरते बोलणे, एकमेकांना निरोप सांगणे वगैरे आपोआप व्हायचे. आता तर घरात फोन असतोच असे नाही तर प्रत्येकाचा सेलफोन वेगळा. धकाधकीच्या जीवनांत योग्य ठिकाणी वापरण्यासाठी डॉक्टर्स, व्यापारी वर्ग, इंजिनिअर्स ई. नक्कीच उपयोगी आहे. परंतु पुस्तकात अभ्यास करतानाही sms आणि अखंड फोन ही शरीराचे अंगच झाल्यासारखे झाले आहे. कोणीही कोणाला कोणत्याही वेळेला कुठेही कॉल करावा. यातून नवीन काहीच निष्पन्न होत नाही तर उलटा बेदरकारपणा वाढला आहे. प्रत्येक खोलीत दूरदर्शन संच असणे, रात्रभर, टीचभर खोल्यांतून कार्यक्रम बघणे म्हणजे 'अति' होत आहे. हे आपल्या सर्वांनाच घातक आहे. पण जो पर्यंत पालक आपल्या कुटुंबासाठी स्वत:ला थोडी मुरड घालायला शिकत नाहीत तोपर्यंत कुटुंबातील व्यवस्था सुधारणे कठीण. नोकरी करण्याची गरज आहे तिथे जरूर करावी. पण नुसतेच ऑफिसमध्ये जाऊन काही रकमेसाठी साचेबंद काम करणे म्हणजे करिअर का? **स्त्रीच्या हाती सुखी घराची दोरी**, अगदी खरं आहे. ज्यांनी स्वत:च्या आयुष्याला एक स्वायत्त हेतू दिला आणि त्यानंतर आयुष्यभर त्याचा पाठपुरावा केला अशा बायका म्हणजे पंडिता रमाबाई, आनंदीबाई जोशी, सावित्रीबाई फुले, दुर्गा भागवत, ताराबाई मोडक, इंदिरा गांधी, मदर तेरेसा, बेगम अख्तर, लता मंगेशकर, विजया मेहता, किरण बेदी, गौरी देशपांडे, इंदिरा हिंदुजा, फुलनदेवी आणि अगदी अलीकडची मेधा पाटकर, कल्पना चावला आणि अरुंधती रॉय. यांचे वैवाहिक जीवन पाहिले तर या बहुतेक जणी अविवाहिता, परित्यक्ता, घटस्फोटिता, विभक्ता, पुनर्विवाहिता वा विधवा आहेत. लग्नसंस्थेवरची एक झणझणीत टिप्पणी म्हणून याकडे बघता येईल. आशा भोसले व सोनिया गांधी यांच्या आयुष्यात दुर्दैवी घटना घडून त्यांनी स्वत:चा शोध घेत एका विशिष्ट चौकटीत असणारं आयुष्य त्यांनी अपरिहार्यपणे स्वीकारलं. आव्हानात्मक जगतायत म्हटले तरी चालेल. पती असताना पतीच्या खांद्याला खांदा लावून कर्तृत्व गाजवणाऱ्या सुधा मूर्ती, सुषमा स्वराज आदी सारख्या स्त्रियाही आहेत, पण यांची संख्या कमी, अपवादात्मक आहे. पती बरोबर नसणं तिच्या सोयीचं आहे. तिच्या पथ्यावर पडतंय त्यामुळे तिला मनासारखं जगता येतायं, असं म्हटल्यास हा विचार काहीसा क्रांतिकारक, समाज विघातक, कुटुंब व्यवस्था मोडकळीस आणणारा वाटू शकेल, पण वस्तुस्थिती स्वीकारायला पाहिजे.

**व्यवस्थेचे परिवर्तन**

कुटुंबव्यवस्थेच्या विकासासाठी आमूलाग्र परिवर्तन हल्ली आवश्यक आहे. संपूर्ण कुटुंबव्यवस्था स्वातंत्र्य आणि समानतेवर आधारित असेल, तर कुटुंबाचा विकास होईल, कुटुंब कशाला म्हणायचे? **माणसाचे**

**माणूस पण वाढविणारी सहजीवनाची प्रयोगशाळा म्हणजे कुटुंब की जे संस्कारामुळे साहित्यिक केंद्र आपोआपच होत असे.** समानसंधी मिळाली तरच विकासाची सुरुवात होते. परंतु आपल्याकडे मात्र ते होत नाही. कुटुंबात राहून व्यक्ति विकास शक्य आहे. आपल्या हक्कांपेक्षा कर्तव्याची जाणीव कुटुंबात अधिक होते.

मात्र आपल्याकडे समतेवर आधारित कुटुंबसंस्था सर्वत्र दिसत नसल्याने आपल्याकडील कुटुंबे ही धर्मशाळा किंवा पंचतारांकित हॉटेलसारखी झाल्याचेही दिसते. कुटुंबात निर्माण होणारे प्रश्न कोणत्या पातळीवर कशा पध्दतीने सोडवावेत, अशावेळी कसे वर्तन असावे, हे आपल्याला शिकवलेच जात नाही. व्यक्तीचा स्वतःकडे, दुसऱ्याकडे आणि समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा असतो यावर व्यक्ती कसा विचार करते हे ठरते. पण ही शिकवण कळत न कळत लहानपणापासून द्यावी. पण 'चल हं, आता तुझ्यावर संस्कार करते, क्लासला घालते.' असं म्हणण्याने ही मनें संस्कारित होणे शक्य नाही. घरातील मोठ्या मंडळीच्या रोजच्या वागण्याबोलण्यातून हे संस्कार पाझरले गेले पाहिजेत. हे एकत्र कुटुंबात - चार पिढ्यांच्यात वावरणाऱ्या 'मी' अनुभवले आहे. व स्वतःचाच हेवा करावा इतके सुख घरी एकत्र कुटुंबात मिळू शकते हे अनुभवले आहे. घरातच सप्तरंगी इंद्रधनुष्य, स्वभावांचे पडते. घरातच चांगले आदर्श सापडतात 'घर' च विद्यापीठ होते. अगदी झोपडपट्टी ते बंगल्यात, वाड्यांतून रहाणाऱ्या कुटुंबात एकच नियम १००% लागू पडत नाही, मान्य आहे. पण शेवटी आपल्या भोवतालची परिस्थिती ओळखून जास्तीत जास्त सलोख्याने वागणे हे सुशिक्षित लोकांनी तरी लक्षात ठेवावे. हे विश्व, हे जीवन सुंदर आहे, छान आहे, याचा आस्वाद घ्यायला शिकायचे, 'माणूस' म्हणून जगायचे, हा संस्कार आधी व्हायला पाहिजे.

दैनंदिन वैयक्तिक जीवनात पूर्वकालीन शिस्तीला जे महत्त्व होते ते आम्ही आधुनिकतेच्या नावाखाली घालवले. या शिस्तीमुळे मनावर आपोआप जे संस्कार होत असत ते नाहीसे झाले. आणि संस्कारित मनामधूनच साहित्याबद्दलची आस्था निर्माण होते ती आस्था आम्ही गमावली. आमच्या धर्मशास्त्रात जुन्या काळी १) पैसा २) बंधू (नातेवाईक) ३) वय (अनुभव) ४) व्यवसाय ५) विद्या. हे माणसाच्या मोठेपणाचे निदर्शक मानले गेले. या पाचांच्या मोठेपणाबद्दल श्रेष्ठ-कनिष्ठतेबद्दल ज्या मनुला आज नाव ठेवली जातात, त्या मनुनं असं म्हणून ठेवलं की, क्रमानुसार या पाचांपैकी जे पुढचं ते मागल्यापेक्षा श्रेष्ठ. म्हणजे सुरवात जशी पैशापासून होत असली तरी त्याच्यापेक्षा तुम्ही मित्रता कोणाशी ठेवता यावर व्यक्तीचं महत्त्व ठरावं. यानुसार अनुभवापेक्षा ही तुमचा व्यवसाय कुठला? तुमचा पैसा कुठला? आणि तो तुम्ही कसा करता यांच्यावर श्रेष्ठता ठरते. परंतु व्यवसायापेक्षा सुध्दा आयुष्य मोठं व्यापक, म्हणून कर्मापेक्षा म्हणजे तुमच्यापेक्षा तुम्हाला जीवनातल्या किती क्षेत्रातली माहिती आहे हे अधिक महत्वाचं. **म्हणूनच मनुच्या मताप्रमाणे विद्या ही सर्व श्रेष्ठ आहे.** आज आम्ही वित्तापासून म्हणजे धनापासून सुरु करतो आणि तिथेच मनुष्याचा मोठेपणा संपतो. विद्येपर्यंत जायची त्याची तयारी नसते आणि दुर्देवाने त्याची जरुरही भासत नाही. त्यामुळे आमची कुटुंबं, सांस्कृतिक ऊंची गाठू शकत नाही. यामुळे आजच्या शिक्षित कुटुंबामध्ये सुध्दा संपर्क नसतो दोन किंवा तीन पिढ्यांतील माणसं एका घरात स्वतंत्रपणे रहातात एवढाच 'घर' या संकल्पनेचा अर्थ उरलेला आहे. सांस्कृतिक दृष्ट्या हे घर नसून सुधारलल्या सदस्यांची सोयीनुसार एकत्र येण्याची जागा झालेली आहे. ज्या कुटुंबातील सदस्यांची एकमेकांच्या हिताबद्दलची अभिजात आस्था नाहीशी झाली असेल तर ते कुटुंब सांस्कृतिक केंद्र होणं शक्य नाही. या अर्थाने कौटुंबिक आयुष्य उद्ध्वस्तच झालं हे मान्य करायला पाहिजे. याबद्दल खंत तरी वाटते का हा महत्त्वाचा

भाग आहे. या प्रश्नाचं बहुसंख्य घरातून उत्तर नकारार्थी आहे. अशा परिस्थितीत सांस्कृतिक हा शब्द प्रसंगी सोयीचा वाटला तरी अर्थहीनच आहे.

वित्तं बन्धुः वयः कर्म विद्या भवति पञ्चमी

एतानि मान्य स्थानानि गरी यः यद्ययदुत्तरम् ॥

**सुप्त गुणांचा शोध**

खूपच कमी वेळा नवरा-बायको पटवून घेऊन काहीतरी भव्यदिव्य करताहेत असे लक्षात येते. कुटुंबाच्या चौकटीने स्त्रीला बांधून ठेवलं आहे. जर शरीराने आणि मुख्यत: मनाने ती त्यातून बाहेर पडली नाही तर तिची घुसमट अपरिहार्य आहे. काहींना ही घुसमट वाटणं शक्य नाही. कारण त्यातच त्यांना धन्यता वाटू शकते. पण त्यांना स्वत:च्या सामर्थ्याचा शोध, स्वत:च्या सुप्त गुणांचा शोध लागलाय का ? हल्ली सुशिक्षित ठिकाणी भगिनी पहिल्या जबाबदारीतून थोड्या मोकळ्या झाल्यावर आपापले छंद, समाजकार्य, वाचन, गायन इतर संगणक क्लासेस भरवतात, शिकताना दिसतात, स्वत:चा वेळ छान घालवतात. लग्नापूर्वी शैक्षणिक क्षेत्रात उत्तम नावाजलेल्या मुली, नंतर मात्र नोकरीसाठी कुठेतरी चिकटून बसलेल्या असल्या की त्या शिक्षणाचा अपमान करतात की काय, तसेच अतिलोभापायी घरदार वाऱ्यावर सोडून पैशाच्यामागे करिअरच्या मागे धावणाऱ्या बायकांनाही असेच म्हणावे लागेल. **कारण शिक्षण हे कशासाठी घेतले आहे हेच विसरले जाते.** कुटुंबसंस्था ही स्त्रीच्या कर्तृत्वाच्या मुळावर उठणारी आहे, हे टोकाचं विधान आहे. पण म्हणून त्याचा वास्तविकताही तपासणं गरजेचं आहे आज जपान मध्ये ७०% स्त्रिया लग्नाशिवाय, एकट्या रहाणं पसंत करतात, हे कितपत योग्य आहे ? म्हणजेच स्त्रीला कुटुंबासाठी, घरातील मंडळींसाठी थोडी जास्त मुरड घालावी लागली तर जरूर घालावी. कारण पुरुषांपेक्षा स्त्रियांच्या अंगात सर्वच प्रकारच्या शक्ती जास्त आहे. स्त्री पुरुषाच्या बरोबरीने समर्थ असली तरी प्रजोत्पादन करणे व तिचे पालन करणे हे काम पुरुष वर्ग करु शकत नाही. घराची, पिढीची दोरी स्त्रीच्या हातात आहे. आता ही दोरी सैल झाली आहे त्यामुळे कुटुंब हे संस्कार व साहित्यिक केंद्र राहिले नाही हे मान्य करावे लागेल.

गणपती पासून, दिवाळी, होळी, हळदीकुंकू रांगोळी वगैरे सण, उत्सव साजरे व्हायचे, केळवणं व्हायची, साठी शांत, मावंदी असे कार्यक्रम व्हायचे. पण आता रात्री १२ नंतर फोनवर वाढदिवस साजरे करण्याचा किंवा हॉटेलमध्ये केळवणं करण्याचा जमाना आला आहे. 'आपले वाढदिवस लोकांनी साजरे करावेत, असं काम आपण करावे' - असं सांगणारी जुनी पिढी जयंती, पुण्यतिथी यांची सुट्टी दिली जाते. पण लोकमान्य टिळक जयंतीला 'स्वदेश वस्तू' च्या वापराचे महत्त्व स्वभाषेतून बोलण्या चालण्याचा संकल्प आपण करतो का ? गांधीजयंतीच्या दिवसापासून 'स्वावलंबन', साधेपणाची राहणी आपण स्वीकारतो का ? स्वातंत्र्यापूर्वीचा काळ खेड्यातून, शहरातून सर्वत्र समाजात एकच ध्येय होते, 'स्वातंत्र्य मिळवणे'. आता आम्हाला फक्त 'स्व'च पाहिजे आहे. फक्त 'मी' खरा 'मी' कोण ह्याचे तरी ज्ञान करुन घेऊन नराचा नारायण होण्याचा प्रयत्न करुयात. शेवटी अगदी मनापासून पसायदान म्हणूयात म्हणजे विश्वशांतीचीच मागणी ॐ शांतिः शांतिः शांतिः - असे म्हणत हात जोडले जातात.

सौ. सुमेधा विजय बेडेकर
शिवशक्ती, गावदेवी मैदानाजवळ,
ठाणे.

•••

# कथाकार भारत सासणे यांचं साहित्य आणि साहित्यसूची

*मराठी साहित्यातील श्रेष्ठ कथाकार श्री. भारत सासणे यांचा पहिला कथासंग्रह (जॉन आणि अंजिरीपक्षी) १९८० साली प्रकाशित झाला. ग्रंथरूपाने मराठी साहित्यात पाऊल ठेवण्याच्या त्यांच्या कार्याला यंदा २५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यांच्या ग्रंथप्रकाशनाचा हा रौप्यमहोत्सवा निमित्त आम्ही 'दिशा' तर्फे त्यांच्या साहित्याचा आढावा आणि त्यांची साहित्यसूची प्रकाशित करीत आहोत. श्री. सासणे यांच्या 'अभ्यासकांना तसेच कथेच्या अभ्यासकांनाही' सदर मजकुराचा उपयोग होईल असा विश्वास वाटतो. - संपादक*

श्री. भारत सासणे हे मराठीतले समर्थ कथाकार आहेत; परंतु केवळ कथाकार ही त्यांची ओळख अपुरी ठरेल. त्यामुळे प्रथम त्यांच्या लेखनाचा धावता आढावा घेणे अप्रस्तुत ठरणार नाही.

सासणे यांच्या साहित्य निर्मितीचा उगम हा त्यांच्या शालेय जीवनातच सापडतो. वर्गात ते मुलांना स्वरचित गोष्ट सांगत असत. वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी त्यांनी आपल्या मित्राच्या सहकार्याने 'रंजन' नावाचे हस्तलिखित काढले होते. जुलै १९६४ ते जून १९६५ या कालावधीत त्याचे एकूण सहा अंक निघाले. या अंकाची सजावट, चित्रे सासणे यांची होती व शिवाय यातून त्यांच्या कथा व क्रमशः चालणारी कादंबरी प्रकाशित झाली आहे. त्यावेळेच्या त्यांच्या त्या साहित्यावर नजर फिरवली तर लहान वयात अंकाची असणारी जाण व 'कथा' या वाङ्मय प्रकारचे त्यांना असणारे भान अचंबित करणारे आहे.

दहावीत असताना त्यांची पहिली कविता, साप्ताहिक सकाळ मध्ये प्रकाशित झाली व पुढच्या काळात 'हंस', अनुष्टुभ 'कवितारती' सारख्या दर्जेदार वाङ्मयीन नियतकालिकात अनेक कविता प्रकाशित झाल्या. त्यांचे एकत्रित संकलन न झाल्याने सासणे यांच्या कवितांची दखल मराठी वाङ्मयाने घेतली नाही.

महाविद्यालयीन शिक्षणाकरिता ते अहमदनगर महाविद्यालयात आले. या काळात प्रामुख्याने त्यांनी दोन वाङ्मय प्रकार हाताळलेले दिसतात. त्याकाळात विविध नियतकालिकांच्या तर्फे कथास्पर्धा होत असत. त्यातील अनेक कथास्पर्धांमध्ये सासणे यांनी भाग घेतला आणि बहुतेक स्पर्धांमध्ये त्यांच्या कथांना प्रथम पारितोषिके प्राप्त झाली.

महाविद्यालयीन कालखंडात त्यांनी अनेक एकांकिका, नाटके लिहिली. त्यापैकी काहींचे प्रयोग त्यांच्या महाविद्यालयातील मित्रांनी केले. कथा स्पर्धेच्या या कालखंडात 'प्रपंच' मासिकातर्फे घेण्यात आलेल्या कादंबरी लेखन स्पर्धेत 'आदिताल' या कादंबरीस द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले व ती त्या मासिकात प्रसिध्दही झाली. १९८० साली त्यांचा पहिला कथासंग्रह (जॉन आणि अंजिरी पक्षी) प्रकाशित झाला. तत्पूर्वीच त्यांची साहित्यनिर्मिती विविध वाङ्मय प्रकारात संचार करीत होती हे यावरुन दिसते. १९८० साली पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला आणि आज २००५ सालापर्यंत म्हणजे २५ वर्षात, ४ कथांचे संग्रह, ५ दीर्घ कथांचे संग्रह, १ कादंबरिका, १ लघुकादंबरी, १ कादंबरी, १ अनुवादित कादंबरी, ३ नाटके, २ बाल-कादंबऱ्या, १ बाल नाटिका अशी एकूण १९ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. यापैकी 'लाल फुलांचे झाड' (कथासंग्रह) आणि 'कँप/बाबीचं दुःख' व

'चिरदाई' (दीर्घकथासंग्रह) या पुस्तकांच्या दोन आवृत्या प्रकाशित झाल्या. १९ पुस्तकांच्या व्यतिरिक्त अनेक कथा, कविता, एकांकिका, दीर्घकथा, बाल-कथा असंग्रहित स्वरुपात, परंतु विविध नियतकालिकांतून प्रकाशित झाल्या आहेत.

१९८० साली प्रकाशित झालेल्या पहिल्याच कथासंग्रहाला उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला आणि पुढे बहुतेक सर्वच पुस्तकांना विविध वाङ्मयीन पारितोषिके लाभली. कै. केशवराव कोठावळे पारितोषिक, कै. नरहर कुरुंदकर पुरस्कार, डॉ. अ. वा. वर्टी कथालेखक पुरस्कार, बी. रघुनाथ पुरस्कार, भैरुरतन दमाणी पुरस्कार, ना. सी. फडके पारितोषिक, यशवंतराव चव्हाण पुरस्कार, विभावरी मधुकर पाटील वाङ्मय पुरस्कार, महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार असे कितीतरी मानाचे पुरस्कार सासणे यांना प्राप्त झाले आहे.

कथा, कविता, एकांकिका, नाटक, दीर्घकथा, कादंबरिका, लघुकादंबरी, कादंबरी, बालकादंबरी, बालनाटिका असे विविध वाङ्मय प्रकार हाताळणाऱ्या सासणे यांनी मराठी वाङ्मयाच्या इतिहासात **'दीर्घकथा' या वाङ्मय प्रकाराला मानाचे स्थान प्राप्त करुन दिले ते त्यांच्या चिंतनशील विचारांमुळेच !** सातत्याने सासणे यांनी केलेलं 'दीर्घकथा' या वाङ्मय प्रकाराचं चिंतन मराठी समीक्षेने मान्य केलं.

मराठी समीक्षेने त्यांची गंभीर स्वरुपात जरी दखल अजून घेतली नसली तरी त्यांच्या सर्वच पुस्तकांची दखल वर्तमानपत्रांनी (आणि काही नियतकालिकांनीही) परीक्षणांच्या रुपाने घेतलेली दिसते. मुलाखतींच्या रुपाने सासणे यांची दखल प्रामुख्याने घेतल्याचेही नमूद करायला हवे. 'पद्मगंधा' सारख्या दिवाळी अंकात त्यांची दीर्घ मुलाखत प्रकाशित झाली आहे. मुंबईत झालेल्या 'कथा महोत्सवात' (दि. ३० सप्टें. २००५ ते २ ऑक्टो. २००५) सासणे यांची दोन तास जाहीर मुलाखत घेण्यात आली हा त्यांच्या कथालेखनाचाच मोठा सन्मान ठरतो.

**सासणे यांचं कथाविश्व**

भारत सासणे यांच्या अनेक कथांमधून सर्वसामान्यांच्या जगण्याबद्दल एक प्रकारची अपार करुणा दिसते. सर्वसामान्यांच्या दुःखाबद्दल त्यांची कथा वेध घेते. लग्न होऊ न शकलेले तरुण कुरुप असतात. परिस्थिती पुढे लाचार, दीन, आणि गरीब बापडे झालेले असतात. उदा. नैनसुख (पाप आणि वटवाघूळ), दावके (उंट), रंगराज (रंगराजाचा अजगर), अलीफ (डफ), भिकारी, महारोगी, लहान मुलं, आंधळे अशा अनेक सामान्यांचा वेध सासण्यांची कथा घेते.

स्त्रियांविषयी, त्यांच्या कष्टांविषयी, एकटेपणा, घटस्फोट, मूल न होण्याची समस्या, लग्नाचा प्रश्न आणि लग्नाचा बाजार, आजारपण, कोंडलेपणा, पुरुषप्रधान संस्कृतीचा वचक, दबाव सासणे यांची कथा अधोरेखित करते.

वृद्धांविषयी तर सासणे यांची कथा अधिक विचारी होताना दिसते. वृध्दांच्या दीर्घायुष्याविषयी, मरणाची वाट बघत बसणाऱ्या कंटाळवाण्या आयुष्याविषयी, आजारपण, याबद्दल सासणे यांना कमालीची उत्सुकता आहे.

सासणे यांच्या कथेला तालुका पातळीवरील जीवनाचे आकर्षण आहे. माणसाचं, पशूचं स्थलांतर, दुष्काळ, भूक, पर्यावरणाचा प्रश्न, तेथील राजकारण, शासन, नेते मंडळी, यांचा वेध जशी सासणेंची कथा घेते, तशीच महानगरीय धकाधकीचं आयुष्य, यंत्रवत झालेलं जीवनमान, माणुसकीचा अभाव, तुटलेला संवाद आणि संबंध यांचंही चित्रण त्यांच्या कथेत येतं, याचबरोबर 'लिंपण', 'नवा सूर्योदय' सारख्या कथांमधून दलित

जीवनाचं वेगळेपण सासणे यांची कथा सांगते, तरीही त्यांच्या कथेवर नागर, ग्रामीण, दलित असा शिक्का मारता येत नाही इतकी ती मिश्र स्वरुपात साकार होते.

पाऊस, रात्र, थंडी असे नैसर्गिक वातावरण त्यांच्या कथेत पुन:पुन्हा येते. अनेकदा पाऊस किंवा रात्र, थंडी एखाद्या पात्राच्या रुपानेच कथेत वावरत राहते. गूढ वातावरणात भयप्रद अशा अज्ञाताचा शोध, सत्याची उकल करण्याची जीवघेणी धडपड सासणे यांची पात्रे करतात. ही पात्रे स्वप्नात, दिवा-स्वप्नातही जगतात व स्वत:ला जगवतात. जीवनाचं, आयुष्याचं भाष्य वाटावं असं सूत्र वाक्य बोलतात आणि संस्कृतीला, जगण्यालाच एक प्रकारची थप्पड द्यायचा प्रयत्न करतात.

सासणे यांच्या कथांमधली पात्रे कुरुप आहेत, रांगडी, काळी, दणकट आहेत. हास्यास्पद आडनावांची आहेत, तरीही अपवादानेच सासणे पात्रांना आडनावे देतात. आणि असे असूनही त्यांच्या पात्रांची भाषा, संवाद हे जातपात, सामाजिक दर्जा, पात्रांची वैचारिक कुवत, बौध्दिक क्षमता, त्यांच्यावरचे संस्कार, कुटुंबाचा त्यांच्यावर होणारा परिणाम याची साक्ष देणारी ही पात्रे ठसठशीत होत जातात, ती त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीमुळे, भाषेमुळेच.

सासणे यांनी कथालेखनात विविध प्रकारचे प्रयोगही केले आहेत. कथेत नाटक येणं, नाटकातील संवाद येणं, स्वगतं, पात्र येणं इत्यादी. 'उपसंहार' कथेत एक वेगळंच तंत्र आहे. त्यातील वामन हे पात्र काही कृती करतेही व त्या कृती नाकारतेही. 'ठकीच्या लग्नाची गोष्ट' या कथेत तर विविध स्तर दिसून येतात. वेगवेगळ्या 'लेव्हल्स' वर ती कथा वावरते. रुढ अर्थाचे संवाद तिथे निरर्थक ठरतात. 'कोलाज आणि केऑस' या कथेत पत्र व नोंदी यांचं बेमालूम मिश्रण आहे. 'शुभवर्तमान' या कथासंग्रहात अशा विविध प्रयोगांच्या कथा एकत्रित झालेल्या सापडतात.

१९८० साली पहिलं पुस्तक प्रकाशित झालं. याचा अर्थ २००५ साल म्हणजे भारत सासणे यांच्या पुस्तकाचं रौप्य महोत्सवी वर्ष आहे. एका कसदार आणि गंभीर प्रकृतीचं लेखन करणाऱ्या या कथाकाराच्या उचित गौरव व्हायला हवा असे मला त्यांचा एक चाहता, एक वाचक आणि त्यांच्या साहित्यावर थोडफार लेखन केलेला माणूस म्हणून वाटतं.

## भारत सासणे यांच्या साहित्याची सूची

### ग्रंथसंपदा

१. **कथासंग्रह**

१. जॉन आणि अंजिरी पक्षी. अंमळनेर : चैतश्री प्रकाशन, १९८०. पृ. ६+१३३ मुखपृष्ठ : सुभाष अवचट. मूल्य रुपये १५=०० डेमी.

२. लाल फुलांचे झाड. पुणे : प्रतिमा प्रकाशन, १५ फेब्रु. १९८४. पृ. २२० मुखपृष्ठ : रमेश भारताल. मूल्य रुपये ४०=००. डेमी

३. लाल फुलांचे झाड. 'री आ. पुणे : प्रतिमा प्रकाशन, १५ ऑगस्ट १९९९ पृ. २३२ मुखपृष्ठ : सतीश खैरे. मूल्य रुपये १५०=००. डेमी

४. आयुष्याची छोटी गोष्ट. मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन, जुलै २००४. पृ. ६+१९४. मुखपृष्ठ : रविमुकुल. मूल्य रुपये १५०=००. डेमी.

५. शुभवर्तमान मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन, जुलै २००४. पृ. ८+१८४. मुखपृष्ठ : चंद्रमोहन कुलकर्णी. मूल्य रुपये १४०=००. डेमी.

२. **दीर्घकथासंग्रह**

६. कँप/बाबींचं दु:ख. मुंबई : वाल्मीक प्रकाशन, १९८२. पृ.

७. कँप/बावीचं दु:ख. २री आ. मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन, फेब्रु. २०००. पृ. ४+७६. मुखपृष्ठ : चंद्रमोहन कुलकर्णी. मूल्य रुपये ७०=००. डेमी.

८. चिरदाह. मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन, जाने. १९८६. पृ. १८१. मुखपृष्ठ : सुभाष अवचट. मूल्य रुपये ५०=०० डेमी.

९. चिरदाह. ेरी आ. मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन, जून १९९८. पृ. १६+१८१. मुखपृष्ठ : सुभाष अवचट. मूल्य रुपये १००=०० डेमी.

१०. अस्वस्थ, विस्तीर्ण रात्र. मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन, फेब्रु. १९९१. पृ. ८+१६५. मुखपृष्ठ : चंद्रमोहन कुलकर्णी. मूल्य रुपये ५०=००. डेमी.

११. अनर्थ. मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन, मे १९९८. पृ. ८+२४६. मुखपृष्ठ : चंद्रमोहन कुलकर्णी. मूल्य रुपये १५०=००. डेमी.

१२. रात्र, क्षितीजावरची रात्र. मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन, ऑग. २०००. पृ. ६+१८९. मुखपृष्ठ : चंद्रमोहन कुलकर्णी. मूल्य रुपये १५०=००. डेमी.

## ३. कादंबरिका

१३. दूर तेथे, दूर तेव्हा/सर्प. मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन, मार्च २०००. पृ. ४+२३०. मुखपृष्ठ : रविमुकुल. मूल्य रुपये १५०=००. डेमी.

## ४. लघुकादंबरी

१४. दोन मित्र. मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन, मे २००४. पृ. ६+१३४. मुखपृष्ठ : रविमुकुल. मूल्य रुपये १२०=०० डेमी.

## ५. कादंबरी

१५. राहीच्या स्वप्नांचा उलगडा. मुंबई : मौज प्रकाशन गृह, १५ मे २००२. पृ. मुखपृष्ठ : मूल्य रुपये डेमी.

## ६. अनुवादित कादंबरी

१६. दंतकथा. मूळ लेखक अब्दुल बिस्मिल्लाह. मुंबई : नवचैतन्य प्रकाशन, एप्रि. २००५. पृ. ५६. मुखपृष्ठ - रेखाटने : मनोज आचार्य. मूल्य रुपये ६०=००. डेमी. पुठ्ठा बांधनी. रॅपरसह.

## ७. नाटक

१७. मरणरंग (तीन अंकी) पुणे : प्रतिमा प्रकाशन, पृ. मुखपृष्ठ : मूल्य रुपये

१८. नैनं दहति पावक : (तीन अंकी) पुणे : प्रतिमा प्रकाशन, पृ. मुखपृष्ठ : मूल्य रुपये

१९. आतंक. (दोन अंकी) पुणे : प्रतिमा प्रकाशन, पृ. मुखपृष्ठ : मूल्य रुपये

## ८. बालवाङ्मय

### कादंबरी

२०. जंगलातील दूरचा प्रवास. मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन, १९९८. पृ. मुखपृष्ठ/रेखाटने: मूल्य रुपये

२१. टुणटुण बेडकाचा प्रवास. मुंबई: मॅजेस्टिक प्रकाशन, ऑग. २००४ पृ. मुखपृष्ठ/रेखाटने: मूल्य रुपये

### नाटिका

२२. चल रे, भोपळ्या! हंडाभर मोहरा. मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन, २ जाने. २००१. पृ. मुखपृष्ठ/ रेखाटने: मूल्य रुपये

**असंग्रहित साहित्य :**

**कादंबरी (प्रकाशित)**

१. आदिताल. प्रपंच

२. पोर्ट्रेट. शब्दालय दिवाळी अंक

**नाटक (अप्रकाशित)**

१. दुश्चिन्ह

२. त्या तिथे पलिकडे

३. अचानक

**एकांकिका (अप्रकाशित)**

१. अधुरी एक कहाणी

२. दुष्टचक्र

३. मरणरंग

४. सूर्यविलाप

५. चिरदाह

६. थिएटर

**नभोनाट्य (अप्रकाशित)**

१. राक्षस आणि चंद्रोदय

**लघुकादंबरी (प्रकाशित)**

१. दुश्चिन्ह आणि चाफ्याचे फूल. साधना दिवाळी

**कथा/दीर्घकथा (प्रकाशित)**

१. सायलेन्स. मौज

२. ग्रहण. मौज

३. लग्न. मौज

४. जुआखाना. मौज

५. ते वडाचं झाड. दीपावली

६. अंत आणि दुःखाचा अंत. दीपावली

७. त्वचा. मौज २००४

८. अन्न. दिपावली

९. तिची समन्या. जनप्रवाह दिवाळी २००२

१०. डाईंग डिक्लरेशन. अनुभव दिवाळी २००२.

११. विदूषकाचा मुखवटा. मानस २००१

१२. सदुच्या दोन कथा. तरुण भारत दिवाळी २००२

१३. साहेब आणि त्याचा कुत्रा. जनप्रवाह दिवाळी २००१

१४. अनुभव. मुक्तसंवार दिवाळी २००१

१५. पाचवा वेद. आशयघन दिवाळी २००३

१६. देवदूत

१७. हॅलो मिस्टर डेथ. कदंब दिवाळी २००४. पृ. ८-११ व १८५

१८. उदास कवींच्या रात्री... मुक्तसंवार दिवाळी

१९. लाच. रंजन हस्तलिखित सप्टें. १९६४

२०. पितळी शिक्का. रंजन सप्टें. १९६४

२१. निखारा. रंजन मे १९६५

२२. शिघ्रदूत. रंजन मे १९६५

२३. समाधी. रंजन मे १९६५

२४. शाप. रंजन जुलै १९६४

२५. बंडू धडपडे : एक पराक्रम. रंजन जुलै १९६४

२६. ------- रंजन जून १९६५

२७. चित्रकाराचा संदेश. (क्रमशः) रंजन

**कविता (प्रकाशित)**

१. रविवार सकाळ (पहिली कविता)

२. हंस (अनेक कविता)

३. माझ्या स्वप्नांचे भाषांतर. अनुष्टुभ मार्च-एप्रि. १९८३

४. कवितारती

**बालकथा (प्रकाशित)**

१. अदभूत साहस यात्रा. छात्र प्रबोधन दिवाळी २००३

**सदर लेखन**

१. खिडकीतून आकाश लोकमत

२. खिडकीतून आकाश. महानगर सांज दैनिक, मुंबई.

**लेख**

१. स्वागत. ललित जून १९८१ पृ. ३७

२. यक्षनगरीच्या आठवणी. अनुष्टुभ. सप्टें.-डिसें. दिवाळी १९९०. पृ. १८-३४.

३. माझे समकालीन व कथाकार. 'कथाशताब्दी' संपा. विजया राजाध्यक्ष व अशोक रानडे. मुंबई : ग्रंथाली वाचक चळवळ, १९९३. पृ. ६१-६५. (या ग्रंथात समाविष्ट)

४. अनुष्टुभ छंद : सीता शक्ती. जनप्रवाह दिवाळी २००४

५. रामो दाहाराये : शूरो. चौफेर समाचार दीपावली २००४ पृ. ८-१०.

६. भय इथले संपत नाही. चतुरंग अन्वय २००४ पृ. ३६-३८.

७. बालसाहित्य. अनुभव जून जुलै २००५.

**भाषणे**

१. मी का लिहितो ? पुणे विद्यापीठ - मराठी विभाग

२. चिंतन. पुणे आकाशवाणी - आत्मरंग सदर - तीन भागात

३. सत्काराला उत्तर. विभावरी मधुकर पाटील पुरस्कार स्वीकारताना. दादर-मुंबई. जुलै २००३.

**मुलाखती**

**प्रकाशित**

१. माझे लेखन विश्व. मुलाखतकार निलिमा पालवणकर. 'साहित्यसूची' ऑक्टो. २००१. पृ. ३७ -

२. अनुभवाच्या उडीत कर्मा पडतात लेखक. मुलाखतकार प्रकाश खांडगे. 'लोकमत' २० जूलै २००३ पृ. ४

३. एक प्रवास क्षितिजापर्यंत. मुलाखतकार प्रा. संजय आर्वीकर. 'पद्मगंधा' दिवाळी २००२. पृ. ४०-५३ आणि १७६-१८८.

४. मुलाखतकार प्रा. दासू वैद्य.

५. मुलाखतकार चंद्रकांत भोंजाळ. महानगर

**प्रकट/जाहीर**

१. कै. केशवराव कोठावळे पारितोषिक, निमित्त, पुणे मॅजेस्टिक गप्पा.

२. विद्यार्थ्यांसाठी. पेण . मुलाखतकार चंद्रकांत भोंजाळ

३. साधना साप्ताहिक, पुणे. मुलाखतकार चंद्रकांत भोंजाळ

४. कथा संमेलन. दादर माटूंगा कल्चरल सेंटर, मुंबई. दि. १ ऑक्टो. २००५. वेळ १२.३० ते २.०० मुलाखतकार डॉ. प्रदीप कर्णिक व चंद्रकांत भोंजाळ

५. साहित्य संमेलन, औरंगाबाद. ई टीव्ही. 'संवाद' कार्यक्रमात मुलाखतकार राजू परुळेकर.

६. शरदाचे चांदणे - दूरदर्शन मुंबई केंद्र. मुलाखतकार निलिमा भावे (विद्याधर पुंडलिकांसह)

७. 'लिपण' कथेविषयी. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**संपादित ग्रंथात समाविष्ट झालेल्या कथा**

१. कर्म. अस्त्र दिवाळी १९८०. संपा. य. दि. फडके आणि इतर. पुणे : विश्वकर्मा साहित्यालय, मे १९८१. पृ. १४०-१६४.

२. बाबीचं दुःख. अनुष्टुभ कथा. अंमळनेर : चैतश्री प्रकाशन.

३. चिरतरुण दुःखाचे बुरूज.
संपा. सुधा जोशी.

४. चिरतरुण दुःख के बुरूज. (हिंदी अनुवादित)
भाषां. ह. श्री. साने. भारतीय कहानिया संपा.
भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन.

५. नया सुर्योदय. (हिंदी अनुवादित)
भारतीय कहानिया. संपा.
भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन.

६. जॉन आणि अंजिरीपक्षी (इंग्रजीत अनुवादित) भाषां. विजय दिवाण. Indian Literature.

**चित्रपट / व्यावसायिक नाटक**

१. नवा सुर्योदय या कथेवरुन 'सुर्योदय' नावाच्या चित्रपटाची निर्मिती.

२. चिरदाह या कथेवरुन चित्रपटाची पटकथा निर्मिती, चित्रपट तयार झाला नाही.

३. एका प्रेमाची दास्तान या कथेवरुन 'सावर रे' हे व्यावसायिक नाटक.

**समीक्षा आणि ग्रंथपरीक्षणे**

१. सुरेश संभाजी. दीर्घकथेचा एक टप्पा - चिरदाह. आरती दिवाळी १९९० पृ. ४५ -

२. नागनाथ कोत्तापल्ले. दशकातील साहित्यिक - भारत सासणे. ललित मे १९८९ पृ. ११ -

३. रत्नाकर मतकरी. सौंदर्यवादाचा सापळा. महानगर १२ जुलै २००३

४. प्रदिप कर्णिक. प्रतिमा, प्रतीकं, मतकरी आणि सासणे. महानगर २६ जुलै २००३

५. चंद्रकांत भोंजाळ. मतकरींच्या लेखाचा सापळा. महानगर २६ जुलै २००३

६. रत्नाकर मतकरी. 'राही' समज आणि गैरसमज. महानगर

७. चंद्रकांत भोंजाळ. टोकदार शिंगाच्या बैलाशी झुंज. महानगर

८. बाळकृष्ण कवठेकर. राहीच्या स्वप्नांचा उलगडा.

९. पुष्पा राजापुरे - तापस. लोकसत्ता

१०. संजय आर्वीकर.

११. प्रिया जायकर. एस. एन. डी. टी. विद्यापीठ, पुणे. एम. फिल. प्रबंधिका.

१२. जयवंत दळवी. प्रस्तावना 'चिरदाह' संग्रहात समाविष्ट

**ग्रंथपरीक्षणे**

१. **लाल फुलांचं झाड**

१. आशा कर्दळे. माणूस. २३ जून १९८४ पृ. २१

२. ललिता वैद्य. महाराष्ट्र टाइम्स. २३ जून १९८५ पृ. ३

३. माणूस. ८ जून १९८५ पृ. २१

४. आनंद यादव. ललित फेब्रु. १९८६ पृ. १७ -

**२. आयुष्याची छोटी गोष्ट**

१. म. कृ. गोखले. सकाळ १२ नोव्हें. २००० पृ. ६

२. मीना गुर्जर. तरुण भारत, नागपूर. ४ मार्च २००१ पृ. ५

३. मीना गुर्जर. मुंबई तरुण भारत. ४ मार्च २००१ पृ. ५

४. उषा तांबे. महाराष्ट्र टाइम्स २९ जूलै २००१ पृ. ५

५. शोभा नाफडे सामना ८ जूलै २००१ पृ. ४

**३. कॅंप / बाबींचं दुःख**

१. विजय पोहरेकर. सकाळ ३० जुलै २००० पृ. ६

**४. चिरदाह**

१. वामन देशपांडे. ललित जुलै १९८६ पृ. ४२

२. गंगाधर नेर्लेकर. महाराष्ट्र टाइम्स १७ ऑग. १९८६ पृ. १०

३. वि. शं. पारगावकर. ललित एप्रिल १९८७ पृ. २१ -

४. भालचंद्र फडके. केसरी २६ जुलै १९८७ पृ. ४

**५. अस्वस्थ, विस्तीर्ण रात्र**

१. प्रदीप कर्णिक. ललित जुलै १९९१ पृ. २१ -

२. दीपक घारे. महाराष्ट्र टाइम्स १ सप्टें. १९९१ पृ. ४

**६. दूर तेथे, दूर तेव्हा/सर्प**

१. मल्हार गोखले. सामना, मोहन पाठक. तरुण भारत ३ डिसें. २००० पृ. ४

२. बाळ राणे. सकाळ ३१ डिसें. २००० पृ. ६

३. मोहन पाठक. तरुण भारत २९ एप्रिल २००१

४. विवेक जोग. ललित फेब्रु. २००१ पृ. ३८

५. अशोक जाधव. नवशक्ती २८ जाने. २००१ पृ. ५

६. निलिमा पालवणकर. महाराष्ट्र टाइम्स २१ऑक्टो. २००१. पृ. १२

**७. रात्र, क्षितिजावरची रात्र**

१. नमिता पाटील. तरुण भारत, नागपूर १८ मार्च २००१ पृ. ५

२. जीवराज सावंत. नवशक्ती १८ फेब्रु. २००१ पृ. ५

३. अशोक जाधव. सकाळ २२ जुलै २००१ पृ. ४

**८. अनर्थ**

१. चंद्रकांत बांदिवडेकर. ललित ऑक्टो. १९९९ पृ. २३.

२. शशिकांत लोखंडे. नवशक्ती २९ नोव्हें. १९९८ पृ. ४

३. ललिता गादगे. लोकमत, मुंबई १३ डिसें. १९९८ पृ. ५

४. गीता जाधव. तरुण भारत, मुंबई १ नोव्हें. १९९८ पृ. २

५. दीपक घारे. महाराष्ट्र टाइम्स १३ डिसें. १९९८ पृ. ६

६. मीना वैशंपायन. कथाश्री मे १९९९ पृ. ५९ -

७. विवेक जोग. ललित डिसें. १९९८ पृ. ४२ -

८. रेखा देशपांडे. लोकसत्ता १८ ऑक्टो. १९९८ पृ. ६

**९. राहीच्या स्वप्नांचा उलगडा**

१. परेन जांभळे. नवशक्ती १८ ऑग. २००२ पृ. ५

२. अविनाश थोरात. लोकमत १ सप्टें. २००२ पृ. ५

३. विवेक जोग. ललित ऑक्टो. २००२ पृ. ८६ -

४. माधवी महाशब्दे. सकाळ २६ जाने. २००३ पृ. ४

५. शैला ठळवे. सामना. ३० मार्च २००३ पृ. ४

६. सुरेखा सबनीस. लोकसत्ता ११ मे २००३ पृ. ६

१०. दोन मित्र

१. विजया राजाध्यक्ष. ललित ऑग. २००५

२. लोकसत्ता २ ऑक्टो. २००५

३. प्रल्हाद वडेर. साप्ताहिक सकाळ

४. अनंत मनोहर. तरुण भारत

५. सुहास जवळीकर. महाराष्ट्र टाइम्स

११. मरणरंग

१. शुभा चिटणीस. सामना. ११ ऑग. २००२ पृ. ४

२. रविवार जत्रा १० ऑग. २००३ पृ. ४०

टीप : सदर सूचीचे काम सुरु आहे. प्रस्तुत सूची परिपूर्ण नाही याची जाणीव आहे.

संकलक

**डॉ. प्रदीप कर्णिक**

ग्रंथपाल

डी. जी. रुपारेल महाविद्यालय

मुंबई १६.

**या प्रकारची नवीन लेखकांची सूची दिशासाठी बनवून दिल्यास तिचा नक्कीच विचार होईल**

संपादक

## माहिती करून घ्या !

ठाणे महाविद्यालय परिसर असा उल्लेख करण्याऐवजी ठाणा कॉलेज, बेडेकर कॉलेज असा उल्लेख करणारांसाठी -

महाविद्यालय परिसरात विद्या प्रसारक मंडळ या मातृसंस्थेच्या पुढील संस्था आहेत. त्यांची पूर्ण नावे मुद्दाम देत आहे. केवळ ठाणा कॉलेज म्हणण्यापेक्षा महाविद्यालयाचे नेमके नाव व मराठीत उच्चारले तर ....

१) बांदोडकर कॉलेज- बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय.

२) जोशी कॉलेज - केशव गणेश जोशी कला महाविद्यालय

३) बेडेकर कॉलेज - नारायण गोविंद बेडेकर वाणिज्य महाविद्यालय

४) लॉ कॉलेज - ठाणे महानगरपालिका विधी महाविद्यालय

५) व्हीपीएम् पॉलिटेक्निक - विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

महाविद्यालय परिसराभोवती उद्यान आहे. हे उद्यान अजून विकसित होत आहे. या उद्यानाला 'ज्ञानमार्ग' हे नाव आहे. या उद्यानात छोटे कार्यक्रम (२५-३० जणांचे) सहज होऊ शकतात. कवी संमेलन, साहित्यिक चर्चा, कथाकथन इ. कार्यक्रमांना सोयीच्या ठराव्यात अशा काही जागा मुद्दाम बनविल्या आहेत.

ज्यांना यात रस आहे त्यांनी आमच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

- संपादक

# प्राचीन भारतातील शिक्षण पध्दती

*श्री. शंकरराव मठांची नवी लेखमाला या अंकापासून देत आहोत. त्यांचे लेख आवडतात असे अनेक वाचक भेटीत आवर्जून सांगतात. ही नवी लेखमाला ही दिशाच्या वाचकांना नक्कीच आवडेल अशी आहे - संपादक.*

जीवन विषयक दृष्टिकोन :

यस्तु विज्ञानवान् भवति युक्तेन मनसासदा।
तस्य इंद्रियाणि वश्यानि
सदाश्व इन सारथे :। (कठ उप ३.६)

मन एकाग्र करुन ज्याने श्रेष्ठ प्रकारचे ज्ञान प्राप्त करुन घेतले आहे त्याची इंद्रिये घोड्यावर पूर्ण ताबा असलेल्या (चांगले घोडे असलेल्या) सारथ्या सारखे वश राहतात.

**धर्म विचाराला प्रमुख स्थान :**

तत्कालीन जीवनपध्दतीचा विचार करत असताना संपूर्ण जीवन व्यापणारा धर्म विचारच प्रमुख असल्याने सारे व्यवहार व जीवनातील सर्व श्रेष्ठ पुरुषार्थ या धर्म संकल्पनेतूनच प्रवर्तित होताना आढळतात. प्राचीन वैदिक संस्कृतीचा अगर सनातन धर्म पध्दतीचा विचार करताना एक गोष्ट सर्व प्रथम ध्यानात येते की याची घडण, याचा आकार हा धर्मावर आधारित असून याजवर राजकीय, सामाजिक, आणि वित्तीय विचारांचा प्रभाव अत्यंत अल्प आहे. धर्म जीवनातील सर्व स्तर व्यापणारा एक प्रमुख विचार असल्याने राष्ट्रीय घडण तसेच राजकीय, सामाजिक, वित्तीय आदि विचारांचा अंतर्भाव धर्म या महान् विचाराशी मिळता जुळता असलेला आढळतो. प्रत्येक गोष्ट धर्म आहे की नाही हे पाहिले जात असे. धर्म या संकल्पनेबद्दल ऋषिमुनींची या प्रकारची धारणा होती. म्हणून धर्म या संकल्पनेतून सामाजिक नितिमत्ता प्रस्थापित करणारे नियम निर्माण झाले. सांप्रत काळी देखील धर्मच हिंदूंचे व इतर मानव समूहांचे जीवन व्यापून टाकणारा एक प्रभावी विचार आहे.

याच संकल्पनेमुळे आपला देश म्हणजे एक भौगोलिक वा भौतिक स्वरुपाचा भूखंड न वाटता तो एक अध्यात्म प्रवण देश वाटतो. देश व त्याची संस्कृती ही अविभाज्य अंगे आहेत. असेच आम्हाला वाटते. हिंदुस्थान हे जगातील सर्व प्रथम असे एकच राष्ट्र आहे की ज्या राष्ट्रांनी आपल्या देशाच्या मर्यादा संकुचित केल्या नाहीत. या देशाने बाहेरच्या लोकांना देखील इथे सुखाने नांदू दिले. याचमुळे अनेक भिन्न भाषा, पंथ, धर्म कल्पना असणाऱ्या वंशातील लोकाना त्यांच्या वैशिष्ट्यासह इथे राहता आले आहे. ज्यू आणि पारशी समाज आजही सुखाने नांदत आहेत. सांस्कृतिक जीवनाच्या प्रारंभापासूनच या देशाच्या मर्यादा विस्तारित केल्या गेल्या. भूमी आणि जल यांचे संमिलन होई पर्यंतचा भाग एक राष्ट्र ही व्यापक कल्पना वेद कालापासूनची आहे. ''**पृथिव्यै : समुद्र पर्यताया: एक राष्ट्र इति**।'' या देशाला ब्रम्हर्षि देश, ब्रम्हावर्त, आर्यावर्त, भारतवर्ष, जम्बुद्वीप असे म्हणतात. ही मर्यादाही कमी पडल्यामुळे की काय सर्व भौगोलिक स्तर ओलांडून जाणाऱ्या व्यापक कल्पना स्थिरावल्या. श्रीमत् आद्य शंकराचार्य यांच्या दृष्ट्या स्वदेश म्हणजे तीन भुवने होत ''स्वदेशो भुवनत्रयम्'' पुढील काळात त्यांचाच मागोवा घेत श्री ज्ञानेश्वर महाराज यांनी संपूर्ण विश्वालाच आपले निवासस्थान मानले '' हे विश्वचि माझे घर'' असे म्हटले. ही आध्यात्मिक व्यापक दृष्टीच जीवनात व्यापकता देत

आली आहे. या व्यापकतेचाच परिपोष तत्कालीन शिक्षणातून केला जात असे.

**शिक्षणाचे स्वरुप :**

तत्कालिन शिक्षण वैयक्तिक लाभ उठविण्यासाठी नव्हते. प्रत्येक व्यक्तीला स्वधर्माने (आपल्या धर्माने) वागता यावे यासाठी होते. शिक्षणाकडे अंतिम ध्येयाप्रत नेणारे एक माध्यम म्हणून पाहिले जात होते. **'स्वकर्मणा तं अभ्यर्च्य सिध्दिं विन्दति मानवः।'** हा गीतेतील विचार त्याही काळी होता. तेव्हा **पासूनच "मोक्ष" हाच मानवाचा अंतिम हेतू होता.** यामुळेच तत्कालिन सर्व साहित्यात धर्माला प्राधान्य दिले गेल्याचे आढळते. संस्कृत भाषेच्या माध्यमातून हे सारे साहित्य उदयाला आले आहे. प्राचीन शिक्षण ही तत्कालीन धर्म या विचारसरणीतून निर्माण झालेली संकल्पना आहे. सुस्थित जीवन व जीवनमूल्यांची ओपासना यावर ती आधारित होती. **जीवनाचे स्वरुप केवळ भौतिक नसून नैतिकही आहे, केवळ लौकिक नसून आध्यात्मिकही आहे, केवळ विनाशी नसून शाश्वतही आहे या प्रमुख गोष्टीवर तत्कालिन जीवनमूल्ये आधारित होती.** या जीवन मूल्यांची उपयुक्तता आणि व्यापकता शिक्षणाच्या द्वारे करुन देण्यात येई. तसेच सामाजिक जीवन नीतिमत्ते युक्त असावे हा महत्वाचा विचार शिक्षणाच्या माध्यमातून दिला जात असे.

**जीवन स्वरुप - परिचय :**

जीवन म्हणजे जन्म व मरण युक्त असलेली घटना, जीवनातच मृत्यूलाही स्थान देण्यात आले होते. यामुळेच तत्कालिन मानव हा भौतिक जीवनाबद्दल कधीच गाफिल नव्हता. जन्म व मरण यांची रहस्ये समजल्याखेरीज जीवन व जीवनमूल्यांचा अर्थच ध्यानात येणार नाही असे त्याला वाटे. आपले शरीर म्हणजे पांच-भौतिक जगतातील एक उत्कृष्ट टप्पा आहे आणि बाह्य जीवनाबरोबरच आंतरिक जीवनाचे स्वरुप ध्यान मार्गाने समजावून घेणे **आणि जीवन नेमके काय आहे याचा प्रत्यय घेऊन त्यावर मनन चिंतन करणे हेच ज्ञानाचे लक्षण आहे असे त्याला वाटे.**

संपूर्ण विश्वाच्या पसाऱ्यात पूर्णतेचे ज्ञान कोणते आहे आणि त्यात मृत्यूचे स्थान नेमके काय आहे? हे समजावून घेणे त्या वेळी महत्त्वाचे वाटत होते. जन्म आणि मृत्यू ही पूर्ण सत्ये आहेत काय? अगर ही दोनही सत्याचे भाग वा विभाग असून पूर्ण जीवनाची दोन अंगे आहेत? जीवन व्यक्तीचे (व्यष्टीचे) व अनेकांचे (समष्टीचे) असू शकते. व्यष्टीच्या जीवनाला अंत आहे (मृत्यु) व समष्टी जीवनाला अंत (मृत्यु) नाही. हे निरीक्षणातून ध्यानात येते. **म्हणून व्यष्टीने समष्टित विलीन होऊन जावे आणि सर्व प्रकारच्या विनाश कल्पनेपासून आपली सुटका करुन घ्यावी.** या प्रकारचा बोध त्यांना झाला. एकाकी वा वेगळेपणाने जगणे हाच विनाश आणि सामूहिक वा एकत्वाच्या अनुभूतीने जगणे म्हणजेच अमृतत्व प्राप्ती. **केवळ लौकिक जीवनाच्या मागे धावण्याने विनाश अटळ आहे व तो थोपविला पाहिजे** (अमृतत्वस्य नाशः अस्ति वित्तेन) शिक्षणाचा मुख्य हेतु आपल्या चित्त वृत्तीचा विरोध करणे हाच आहे. कारण इंद्रियांनी घेरले गेलेले मन केवळ बाह्य वा भौतिक जगतातच रमत राहते व विनाश ओढवून घेते याचा अनुभव ते घेते झाले.

**विकासाची परम सीमा पूर्णत्व :**

वैयक्तिक व्यवहारासाठी आणि सामाजिक जीवन सुस्थिर होण्यासाठी केलेले नीति नियम हे लौकिक जगतात अत्यंत आवश्यक आहेत. कारण लौकिक जीवन योग्य पायावर उभे करण्यास त्यांची निश्चित मदत होते. मात्र अंतिम सत्याच्या अन्वेषणासाठी प्रत्येकाच्या मनाचा स्वाभाविक कल, त्याची आंतरिक ओढ, उत्क्रांत होण्यासाठी पुरेशी क्षमता, द्वंद्व दृष्टीमुळे निर्माण होणाऱ्या गोंधळाच्या वेळी समन्वय घडवून आणण्यासाठी लागणारी

कुशाग्र बुद्धी इत्यादी आवश्यक आहेत. अशा प्रकारे उत्क्रांत होत होत अविकारांतल्यात विलीन होण्या इतपत वैयक्तिक विकासाची मर्यादा वाढविणे हेच मानवाचे अंतिम ध्येय होते. मानव हा साक्षात् ब्रम्हस्वरुपच (व्यापकत्व) असून त्याच्यातच दैवी प्रकाश विलसत आहे. **याची जाण त्याला शिक्षणाच्या माध्यमातून करुन देण्यात येत** असे (तत् त्वं असि ।)

शिक्षणाने असा विकास होऊन तो पूर्णत्वाला पोहोचला पाहिजे ही धारणा होती. **केवळ भौतिकतेचे ज्ञान करुन घेणे एवढाच मर्यादित हेतू नव्हता.** व्यक्ती विकासाशी शिक्षण निगडित असे. आजच्या सारखे केवळ माहिती वजा शिक्षण हे त्या काळी अभिप्रेत नव्हते. बाह्य विश्वज्ञानाबरोबरच आंतरिक विश्वाचे ज्ञानही महत्त्वाचे होते. केवळ लौकिक वा उदरभरणाचे साधन म्हणून त्यावेळी शिक्षणाकडे पाहिले जात नसे. लौकिक गोष्टी आणि केवळ त्या संबंधीचे विचार दूर सारल्यावरच समग्रतेचे ज्ञान उदय पावते. **भौतिक शिक्षणाने मानव बध्द होतो. त्याची दृष्टी, त्याचे ज्ञान, याला मर्यादा पडतात. समग्रतेचा विचारच मानवाला मुक्त करतो व एकात्म भाव निर्माण करतो.**

**शिक्षणाचा हेतूः माणूस घडविणे :**

वरील प्रकारच्या विचार सरणीमुळे केवळ भौतिक शास्त्रांचे, अहंकार दुरावणारे, शिक्षण न देता त्या बरोबर मनाला स्वत्वाच्या जाणिवेची उभारी आणणारे, मानवाची घडण करणारे, जेणे करुन त्याला त्याची सभ्यता, संस्कृती याचा परिचय करुन देणारे शिक्षण दिले जावे हा दृष्टिकोन निश्चित केला होता. मानव घडविणे हा मुख्य हेतू साध्य होण्यासाठी त्याच्या मनावर शिक्षणाद्वारे संस्कार करणे हेच एकमेव ध्येय मानले गेले होते. यासाठी शिक्षणात योग पध्दतींचा अवलंब करण्यात येत असे. तत्कालिन शिक्षण पध्दतीत योगाला विशेष महत्व प्राप्त झाले होते. **योग हे सर्व शास्त्रांचे शास्त्र बनले.** मनुष्य घडविणारे साहित्य व शास्त्र या दृष्टीने योग शिक्षण महत्वाचे ठरले. योग प्रक्रियेने मन नियंत्रित झाले व चिंतनशील बनू लागले. यामुळे मनाला खोलवर बुडी मारता येऊ लागली. भौतिक जगतातील द्वंद्वाने निर्माण होणाऱ्या विचार तरंगावर ताबा मिळविणे शक्य झाले. भौतिक जगतातून त्याचे मन विरक्त होऊ लागले आणि त्याचे आंतरविश्व व्यापक झाले. या सर्वांचा परिणाम - तो यथार्थ जीवनाचा अनुभव घेण्यास समर्थ झाला.

**शिक्षणासाठी पूर्व तयारी :**

शिक्षणाचे सारे लक्ष्य व्यक्ती व त्याची घडण यावर केंद्रित करण्यात आल्याने **त्या वेळी शिक्षण वैयक्तिक होते. गुरु व शिष्य यातील संबंध फार सुदृढ पायावर उभे रहावेत यासाठी उभयतांचे साहचर्य प्रस्थापित होण्यापूर्वी विधीपूर्वक धार्मिक संस्कार करण्यात येत असे.** त्याचे नांव उपनयन (गुरु जवळ नेणे). त्यावेळी आता सारखे शिक्षणासाठी ठराविक शुल्क भरुन आपले नांव नोंदविता येत नसे. उपनयन संस्काराने गुरु व शिष्य यांचे नाते पितापुत्र सारखे निर्माण होई. गुरु जणू काही शिष्याला आपल्या प्रज्ञेतून शिक्षणद्वारे नवा जन्म देत असे. म्हणून या संस्कारानंतर त्या शिष्याला आपल्या प्रज्ञेतून शिक्षणाद्वारे नवा जन्म देत असे. **म्हणून या संस्कारानंतर त्या शिष्याला द्विजत्व प्राप्त होत असे.** शिक्षणाची सुरुवात ब्रम्हचर्य व्रत पालनाने होत असे. संपूर्ण शैक्षणिक जीवन ब्रम्हचर्यव्रत पालनानेच घालवावे असा तत्कालीन दंडक होता. या जीवन पध्दतीमुळे सुरुवातीपासूनच बाह्य जगतातील गोष्टींच्या नियंत्रणाने शिक्षणाचा पाया घातला जात असे. शिष्याला गुरु कडेच त्याच्या कुटुंबातील एक घटक म्हणूनच रहावे लागत असे. त्याची शाळा अगर विद्यालय म्हणजे गुरुचे घर वा आश्रम असे. हे स्थान त्याला निवांतपणा मिळवून देत असे.

**गुरु शिष्य नित्य साहचर्य-फायदे :**

गुरु शिष्यांचे घडणारे नित्य साहचर्य शैक्षणिक जीवनात महत्त्वाचे होते, शिष्याला गुरुचे व्यक्तिगत जीवन अत्यंत जवळून बारकाईने पाहता येत असे. गुरुचे आंतरिक जीवन, त्याची व्यापकता, शुध्दता तसेच त्याच्या जीवनात कोणती सत्ये दडलेली आहेत, त्याची कुशाग्र बुध्दी, जीवन मूल्यावरील दृढ श्रध्दा, त्याची काम करण्याची हातोटी आदी गोष्टींचे पाठ त्याला प्रत्यही आपोआप मिळत असत. त्याचे जीवन जवळून पाहता आल्याने शिष्याला समग्र जीवनाची प्रेरणा मिळत असे. **शिक्षणाच्या माध्यमातून माणूस घडतो ही श्रध्दा होती.** गुरुकडून संस्कारयुक्त शिक्षण मिळत असे. शिक्षण देत असताना गुरुचे शिष्याकडे सर्व बाबतीत संपूर्ण लक्ष असे. तत्कालिन शिक्षण केवळ पुस्तकी नव्हते. प्रत्येक शिष्याची मानसिक रचना वेगळी असते, प्रत्येकाचा स्वभाव भिन्न असतो, शिक्षण कशासाठी द्यावयाचे ही कल्पनाही भिन्न असते या साऱ्या गोष्टींचा नीट विचार करुन प्रत्येक शिष्याच्या कलाने व त्याचा बौध्दिक स्तर ध्यानात घेऊन गुरु प्रत्येक शिष्याच्या वैयक्तिक घडणीकडे लक्ष पुरवीत असे व त्यांच्या बद्दल सहानुभूती पूर्वक विचार करीत असे. त्या प्रमाणे त्याला पाठ देत असे. प्रत्येक विद्यार्थ्यात अंतर्गत संघर्ष असतात याची पूर्ण जाणीव असल्याने गुरु त्या गोष्टी समजाऊन घेत असे व त्याना योग्य असा आकार देण्याचा प्रयास करीत असे. गुरु शिष्य साहचर्याचा असा प्रत्यक्ष फायदा तत्कालिन शिक्षण पध्दतीमुळे होत होता.

**गुरु शोधावा लागे :**

योग्य प्रकारे शिक्षण मिळविण्यासाठी शिष्याला गुरु शोधावा लागत असे. उपनिषदातून अशी अनेक उदाहरणे आढळतात. प्रश्नोपनिषदात पिप्पलाद ऋषीकडे सहा तरुण विद्यार्थी हातात समिधा घेऊन आल्याचे वर्णन आले आहे. समिधा अग्नीत टाकल्यानंतर ती अग्निरुप होऊन जाते म्हणजेच तिच्यात प्रकाशमयता आणि तेजस्विता निर्माण होते, त्याच प्रमाणे मी आपले जीवन हे गुरो तुझ्या चरणी वाहून तेजस्वी बनू इच्छितो असे शिष्य या गोष्टीने जणू सुचवीत असे. गुरु देखील त्याची इच्छा जाणून योग्य प्रकारे परीक्षा घेऊन आपल्या आश्रमात शिक्षणासाठी ठेवून घेत असे. आपल्याकडे आलेल्या शिष्याना उद्देशून पिप्पलाद ऋषि म्हणतात - ''तुमचे स्वागत असो. तुमच्या ठिकाणची निष्ठा अत्यंत स्तुत्य अशीच आहे. तुम्ही माझ्या आश्रमात वर्षभर रहा. वर्षानंतर पुन: भेटा. तुमची ही निष्ठा आजच्या इतकीच त्यावेळी तीव्र आढळल्यास मला माझ्या गुरुकडून जे काही ज्ञान मिळाले आहे ते मी तुम्हाला आनंदाने देईन. यावरुन एक गोष्ट ध्यानात येते की आत्मविद्या वा आत्मज्ञान गुरु सहजासहजी शिष्याला देत नसे. त्यांची परीक्षा तो घेत असे. कठ उपनिषदातही यमाने नचिकेताला सहजासहजी आत्मविद्या दिली नाही. त्याची परीक्षा घेतली. कोणत्याही प्रलोभनाला नचिकेता बळी पडत नाही याची खात्री करुन घेतल्यावरच यमाने नचिकेताला विद्या दिली. यावरुन हेच **सिध्द होते की शिष्याची कसून तपासणी केल्या शिवाय त्याला उच्च शिक्षण-ब्रह्मज्ञान दिले जात नसे.** शिष्याची मानसिक व नैतिक पातळी अजमावली जात असे याबद्दल उपनिषदातून अनेक दाखले देता येतील जानुश्रुती पौत्रायण आणि रैक्व यांच्या संवादातून हेच पाहावयास मिळते. जानुश्रुति ज्यावेळी सारे ममत्व टाकून देतो तेव्हाच रैक्व त्याला संवर्ग विद्या सांगतो. याच उपनिषदात आणखी एक कथा आली आहे. उपकोलस कामलायन सत्यकाम जाबाला याजकडे राहून विद्या संपादन करीत होता. गुरु इतराना विद्या पूर्ण झाल्याने त्यांची पाठवणी करतो उपकोसल मात्र तसाच राहतो. गुरु तसाच तीर्थयात्रेला निघून जातो. गुरुने आपल्याला विद्या दिली नाही याचे त्याला खूप वाईट वाटते. तो अन्न त्याग करतो. गुरुच्या गैरहजेरीत अग्नीकडून त्याला बरीचशी माहिती मिळते. गुरु तीर्थयात्रेहून परतल्यावर त्याला त्यापुढील माहिती देऊन

विद्या शिकवितात. यावरुन एक गोष्ट उघड होते की पूर्वीच्या काळी विद्येचे वाटप होत नसे. अधिकारपरत्वे योग्यता अजमावून अशा शिष्यालाच ज्ञान देण्यात येत असे. शिष्याची योग्यता ही महत्वाची कसोटी होती. विद्येची श्रेष्ठता ठळक पणे शिष्यावर बिंबवावी हा प्रमुख हेतू होता. त्यामुळे अवहेलना वा दुरुपयोग आपोआप टाळला जात असे.

**शिक्षण मौखिक असे :**

त्या वेळच्या शिक्षणाचे तीन महत्वाचे टप्पे पाहावयास मिळतात. श्रवण, मनन, निदिध्यासन. श्रवण - गुरुमुखातून येणाऱ्या शब्दांचे नीट श्रवण केले जात असे. ते ऐकून त्याप्रमाणे उच्चारण करण्याची तत्कालिन पध्दती होती. यालाच संथा देणे असे म्हणतात. या पध्दतीतूनच गुरु शिष्य संप्रदाय रुढ झाला. ही रुढि सांप्रतही अस्तित्वात आहे. विशेषकरुन संगीत, नृत्य, तंतु वाद्य इत्यादि बाबतीत संप्रदाय (आजच्या शब्दात घराणे) कसोशीने पाळला जातो. संप्रदाय याचा अर्थ-गुरु शिष्य संबंधातून अखंड मिळणारे ज्ञान. ''संप्रदायो नाम शिष्य उपाध्याय संबंधस्य अविच्छेदेन शास्त्र प्राप्ति:।'' या श्रवण प्रक्रियेमुळे वेदाला श्रुती हे नाव पडले आहे. ज्ञान म्हणजे मनाची घडण करणारी प्रक्रिया, गुरु म्हणजे चालते बोलते ग्रंथालय आणि अध्ययन म्हणजे आत्मज्ञान करुन घेण्याचा प्रयत्न. हे ज्ञान रोमरोमात भिनले पाहिजे. शरीराचे एक अवयव बनून गेले पाहिजे अशी धारणा शिष्याची होत असे. शिष्याला जाणीव करुन दिले जात असे की शब्दात सामर्थ्य आहे, त्याचे महत्वाचे पैलूही आहेत. विशेषत: वेदवाङ्मयांचा अभ्यास करताना त्याच्यातील पदपाठ, त्याचे उच्चारण, उच्चारणाने निर्माण होणारे कंप, त्याचा अर्थ हे जाणून घेतले. कारण शब्द हे ब्रम्हाइतकेच व्यापक आहेत. किंबहुना शब्द म्हणजेच ब्रम्ह होय. शिक्षण मौखिक असले तरी केवळ पाठांतर एवढाच त्यावेळी उद्देश नसल्याचे आढळते. ''य:तत् न वेद किंमृचा करिष्यति।''

**मनन आणि निदिध्यासन**

गुरु मुखातून बाहेर पडलेले शब्द नीट ऐकल्यावर त्याचे मनन केले जात असे व त्याचा सतत पाठ पुरावा करावा लागत असे. त्यामुळे श्रेष्ठ प्रकारचे ज्ञान होण्यास मदत होत असे. सत्याचा अनुभव घेणे म्हणजेच आत्मानुभूति पर्यंत आपल्या मानसिक विस्ताराच्या कक्षा रुंदावणे या सातत्याने शक्य होत असे. शिक्षणाच्या क्षेत्रात मनन व चिंतन याची नितांत आवश्यकता आहे. ही गोष्ट साध्य होण्यासाठी निरंतर व प्रदीर्घ अभ्यासाची कास धरावी लागे. यालाच निदिध्यास असे म्हणतात. श्रोतव्य: मन्तव्य: निदिध्यासितव्य:। या तीन गोष्टींवर विशेषभर उपनिषदातून दिलेला आढळतो. तत्कालिन शिक्षण पध्दतीत आत्मज्ञानाला विशेष प्राधान्य दिले जात असे. छांदोग्यात असे वर्णन आले आहे. नारद - आत्मविद्या मिळविण्यासाठी सनत् कुमाराकडे गेले. तेव्हा सनत् कुमारांनी नारदांना विचारले - आता पावेतो आपले कोणते शिक्षण झाले आहे. त्यावर नारद म्हणाले, 'चारही वेद, वेदांगे, इतिहास, पुराण, राशी (गणित) तर्क इत्यादी' तेव्हा सनत् कुमार त्यांना म्हणाले 'जे काही आपले शिक्षण झाले आहे ते केवळ शब्द ज्ञानाचे होय' श्रेष्ठ प्रतीचे आत्मज्ञान या शब्द ज्ञानाच्या पलीकडेच आहे. त्याच उपनिषदात श्वेतकेतुची गोष्ट आली आहे. गुरुगृही राहून श्वेतकेतू सारे शिक्षण घेऊन आला. मला आता सारे काही ज्ञात झाले आहे असा गर्व त्याला झाला. त्याच्या वडिलानी त्याच्यात झालेला बदल ओळखला. त्यानी आपल्या मुलाला विचारले - एक जाणले असता सारे जाणल्या सारखे होते - **एकं विज्ञाने सर्व विज्ञातं भवति** । या बद्दल तू काही सांगू शकशील काय? श्वेतकेतू म्हणाला - हे नाही माझ्या गुरुने मला शिकविले. भगवन् कृपा करुन तुम्ही मला समजावून सांगा. कठोपनिषदात असे म्हटले आहे की, आत्मा हा वेदाध्ययनाने अवगत होत नाही, तर्काने प्राप्त होत नाही. खूप पुस्तकी

ज्ञानाच्या प्रवचनाने हस्तगत करता येत नाही. या साऱ्या कथनावरून आपल्याला हे ध्यानात येईल की शब्द ज्ञानापेक्षा आत्मानुभूति कडे शिक्षणाचा कल होता. ती प्राप्त करुन घेण्यासाठी शिष्य प्रवृत्त होत असे.

**धंदे शिक्षण :**

तत्कालीन शिक्षण पध्दतीत वेदाध्ययनावर भर होता, परंतु धंदे शिक्षणही दिले जात असे. त्या शिक्षणासाठी देखील शिष्याला ठेवावे लागे. त्या काळी घरगुती शिक्षणावर विशेषभर दिला जात असे. भारत हा कृषिप्रधान देश प्रथम पासूनच असण्याने देशात उत्कृष्ट शेती व्हावी, प्रत्येक व्यक्ती ही उत्तम नागरिक म्हणून प्रतिष्ठित व्हावी हा दृष्टीकोन शिक्षण देताना असे. या गोष्टी शिष्याला नेहमी कराव्या लागणाऱ्या गुरु सेवेतून आपोआप प्राप्त होत असत. उदाहरणार्थ स्वत:चे काम स्वत:च करावे, चालढकल करु नये. कोणतेही काम अप्रतिष्ठेचे मानू नये. गुरुच्या घराची दुरुस्ती करताना, बनातून इंधनासाठी लाकडे गोळा करताना शिष्याला कोणत्याही प्रकारे खंत वाटत नसे, त्याचा अहंकार दुखावत नसे. सर्वत्र भातृभाव निर्माण करण्यासाठी झटणे आदींचे पाठ शिष्याला प्रलही प्रत्यक्ष व्यवहारातून मिळत असत. त्यामुळे गंवडी काम, लाकूड तोड्याचे काम इत्यादीत शिष्य तयार होत असे. गाई राखणे - गोपालन हा त्या काळी मोठा व्यवसाय होता. मोठाले गवळी वाडे होते. श्रीकृष्ण हा गोपालक होता. गोपालनाचे शिक्षण पुरातन काळापासून देण्यात येत असल्याचे अनेक दाखले उपनिषद् ग्रंथातूनही पाहावयास मिळतात.

गोपालनाचे शिक्षण त्या वेळी देण्यात येत असे. गोधन ही तत्कालीन संपत्ती होती. तिचे वर्धन करणे, संरक्षण करणे, दुग्ध व्यवसाय करणे. दुग्धोत्पादक पदार्थ तयार करणे तसेच कृषी व्यवसायासाठी उत्तम बैलांची पैदास करणे या साऱ्या गोष्टींचे शिक्षण दिले जात असे. यासाठी शिष्याला रानावनातून गाईच्या कळपा बरोबर हिंडावे लागे. शारिरिक कष्ट झेलावे लागत. परिणामत: त्याचे शरीर सुदृढ व निरोगी बनत असे. मोकळ्या वातावरणात मनही प्रसन्न राहात असे. छंदोग्य उपनिषदात सत्यकाम जबाला याची गोष्ट या बाबत विशेष उल्लेखनीय आहे. सत्यकाम जबाला विद्याप्राप्तीसाठी गुरुकडे आला असता गुरु त्याला आपल्या आश्रमातला चारशे गाई देऊन त्याला असे सांगतो की यांच्या हजार गाई झाल्या म्हणजे तू परत आश्रमात ये. सत्यकाम त्या गाई घेऊन जातो. रानावनात त्यांच्या मागून भटकत रहातो. त्या काळात गाईची निगा राखणे, त्यांचे रक्षण करणे, खोंड तयार करणे इत्यादींचे प्रत्यक्ष शिक्षण त्याला प्रत्यही मिळत गेले. या बाबतीत त्याला अनुभवाने ज्ञान प्राप्त झाले. त्याच्या मुखमंडलावर हे अनुभवाचे ज्ञान विलसू लागले. हजार गाई झाल्यावर त्यांच्यासह तो आश्रमात परतला. त्याच्या मुखाकडे पाहताच गुरुच्या ही गोष्ट ध्यानात आली. मग त्याने त्याला आत्मज्ञान दिले. या प्रमाणे शिष्याला गुरु प्रत्यक्ष पाठ देत असे.

जीवनातील उपजीविकेच्या साधनांचा विचार तत्कालीन धंदे शिक्षणात केला जात असे. कृषी संबंधी वर्णनात्मक ऋचा ऋग्वेदात (मंडळ ४ सू ५७) आहे. त्या सूक्तातील ऋचांचा सारांश येथे उद्धृत करत आहे. (एकूण आठ ऋचा आहेत - सारांश - क्षेत्रपतीच्या कृपेने आम्ही शेत नांगरतो तो आम्हावर प्रसन्न होवो व आमचे घोडे नांगरण्या योग्य होवो. हे क्षेत्रपते आम्हाला मधुर, शुध्द-चविष्ट, जलधारा प्राप्त होवोत, आम्हाला (जलधारेमुळे) गोडधान्य प्राप्त होवो. आमचे बैल आनंदाने काम करोत. आमची माणसे आनंदाने कष्ट झेलोत. आम्हाला नांगरताना त्यापासून आनंद होवो. शुनसीरानो आम्ही (तुमची) प्रार्थना करतो. आमची जमीन ओली होवो. इंद्र हो आम्हावर प्रसन्न व्हा. पूवन् देना नांगरलेली भूमि पाण्याने मुक्त होवो आणि आम्हाला कालांतराने उत्तम धान्य प्राप्त होवो. हलधराना आनंद होवो. देवता जमीन ओली करोत. गुनसीर आम्हावर कृपा करोत. या वरुन कृषी हा व्यवसाय त्यावेळी

किती महत्वाचा होता हे ध्यानात येईल.

तत्काळीन धंदे शिक्षणात अनेक काल, हस्त व्यवसाय यांच्या अंतर्भाव केलेला आढळतो. तत्कालीन कले संबधीची यादी १) नर्तन कला २) वादन कला ३) विविधवेशभूषा कला ४) चित्र रेखाटन कला ५) अंगाला उटणे लावणे ६) बिछाने पुष्प मालानी सजविण्याची कला ७) अत्तरे तयार करण्याची कला ८) विविध द्यूत क्रीडा कला ९) मध गोळा करणे १०) पक्वाने तयार करणे ११) वृक्ष संवर्धन व पालन १२) उसाच्या उत्पादनाचे विविध प्रकार १३) कापसापासून धागा बनविणे १४) लडी तयार करणे १५) कापड विणणे १६) रेशमी कापड तयार करणे १७) रत्नांना पैलू पाडणे १८) मोत्याला बेज पाडणे १९) सोन्याची परीक्षा करणे २०) सोन्याचे दागिने बनविणे २१) धातू व खनिजे वितळविणे २२) खनिजे व वनस्पती पासून औषधे तयार करणे २३) जखम बरी करणे २४) संयुक्त धातु अलग करणे २५) खनिजापासून वेगवेगळे पदार्थ तयार करणे २६) खनिजातील सर्व प्रकारचे क्षार घालविणे २७) विविध दगडांपासून विविध प्रकारची भांडी तयार करणे २८) उपकरणे तयार करणे २९)पूजनाने देवादिकांना प्रसन्न करून घेणे ३०) माती, दगड, धातू, लाकूड यापासून मूर्ती तयार करणे तसेच विविध वस्तू हत्यारे आणि उपकरणे बनविणे ३१) विहिरी तळी खोदणे ३२) वाद्ये बनविणे ३३) विविध रंग बनविणे ३४) मल्ल युध्दाचे विविध प्रकार व डावपेचात तरबेज होणे ३५) सैन्याची व्यूह रचना करणे ३६) हत्ती, घोडे यांचा युध्दात वापर करण्याची कला ३७) सारथ्य कर्म कुशलता ३८) हत्ती घोड्यावर बसणे व रपेट मारणे ३९) रथ, नौका इत्यादी वाहने बनविणे ४०) ह्या वाहनांचा वापर करण्याची कला ४१) चामडे कमविणे ४२) अंगापासून चामडे वेगळे करणे ४३) दुधा पासून ते तुपापर्यंत पदार्थ तयार करणे ४४) शेत नांगरणे ४५) तण काढणे ४६) झाडावर चढणे ४७) पोहणे ४८) भांडी स्वच्छ करण्यासाठी चूर्ण बनविणे ४९) धुलाई कला ५०) दुसऱ्याचे मन न दुखविता बोलणे इत्यादी.

वरील यादी वरुन दैनंदिन जीवनातल्या साऱ्या उपयुक्त गोष्टींचे शिक्षण हे व्यक्ति परत्वे दिले जात असे. अनेक कलांचा विचार त्या वेळच्या शिक्षण पध्दतीत अंतर्भूत केलेला आढळतो. तत्कालिन शिक्षण सर्व अंगाचा विचार करणारे होते. आणि मुख्यतः मनुष्य घडणीवर विशेष भर दिला जात असे. तो आर्य म्हणजे सुसंस्कृत कसा होईल या कडे लक्ष पुरविले जात असे. वेद वाङमयाच्या ज्ञाना व्यतिरिक्त व्यक्ति परत्वे इतर गोष्टींचे शिक्षण दिले जात असे. श्रीरामच्या भेटी साठी भरत निघाला त्या वेळी चतुरंग सेनेसह जाता यावे या साठी रस्ता तयार करण्यासाठी अनेक कारागीर अहोरात्र खपत होते. त्यांची एक मोठी यादीच वाल्मीकी रामायणात पाहावयास मिळते, यावरुनही किती विविध प्रकारचे शिक्षण त्या काळी दिले जात होते याता विचार करता येईल.

**शिक्षण संस्था :**

या संबंधी विचार करताना वेद काळापासून तो तहत बुध्द काळापर्यंतचा आढावा घेतल्यास एक गोष्ट लक्षात येईल की सुरुवातीला सामूहिक शिक्षणापेक्षा वैयक्तिक शिक्षणावर विशेष भर होता व हळू हळू सामूहिक शिक्षण पध्दती रुढ होत चालली. प्रारंभकाळी गुरु व शिष्य यांची जोडी एकाच कुटुंबातील व्यक्ती सारखी वावरत असे. गुरुचे घर हीच शिष्याची पाठशाळा असे. शिक्षण संस्कार युक्त असे. त्यातून नैतिक व मानसिक घडण होत असे धर्माचरण व आध्यात्मिक जीवन जगण्याची प्रेरणा मिळत असे. बाह्य घडणीपेक्षा आंतरिक विकासावर विशेष भर दिला जात असे. प्रथम पासूनच शिष्याला संयमाचे पाठ दिले जात असत. या साठी ब्रह्मचर्यव्रत हे आवश्यक होते. शिक्षणाची माध्यमे हळू हळू विस्तारित होत गेली. विशेषत: मंदिर, मठ, आश्रम, पवित्र तीर्थस्थान आदी ठिकाणी

शिक्षण देण्याची सोय केली जाऊ लागली. वैदिककाळी ही काही आश्रम स्थाने नावारुपाला आली होती. कण्व, व्यास, नैमिष ही त्या काळची विद्यापीठेच होती. शौनक हा कुलपती म्हणून नावाजला होता. कण्वाश्रम हे एक प्रसिध्द शिक्षणाचे केंद्र होते. उपनिषद काळी अनेक राजे लोक विद्वत् परिषदा भरवीत असत. तसेच काही विद्वान मंडळी याना मिषाने ज्ञानदानाचे कार्य करीत, त्यांना चरक असे म्हणत. पांचाळ राजे लोकांची सभा, जनक राजाची सभा, या विशेष उल्लेखनीय आहेत. वेदकाळी अशा प्रकारच्या सभा यज्ञ सभातून भरत असत तिथे अनेक विद्वान मंडळी एकत्र येत असत विविध शासनाबद्दल उहापोह करण्यात येत असे. रामायण काळी शिक्षण देण्याची सोय मोठ्या आश्रामातून केली जात असे. यांना गुरुकुल असेही म्हणत. भारद्वाजाचे प्रयाग येथील आश्रम, दक्षिणेतील अगस्ति आश्रम, महाभारत कालीन सांदिपनी आश्रम ही नावाजलेली विद्यापीठे होती. व्यासांनी आपल्या चार शिष्यांना पैल, वैशंपायन, सुमंनु आणि जैमिनी याना अनुक्रमे मदक् यजु, अथर्व आणि साम या चारही वेदांचे ज्ञान करुन दिले. व्यासपुत्र शुक्र हाही एक त्यांचा शिष्य होता.

जनमेजय यज्ञ सत्रात वैशंपायनाने भारत कथन केले. हजारो विद्वान मंडळी त्या तिथे जमत. पुढे नैमिषारण्यातील यज्ञ सत्रात उग्रश्रव सौती याने शौनकाला महाभारत सांगितले. महाभारत काळी राजे लोक आपल्या प्रासादातच शिक्षणाची सोय करत असत. प्रथम भीष्मच कौरव पांडवाना शिकवत असे. कृपाचार्यांच्या सांगण्यावरुन त्यानी द्रोणाचार्यांची नियुक्त केली. क्षात्र विद्या विशेषतः धनुर्वेद व त्या संबंधी समग्र माहिती शिष्याना देण्यात येत असे. सैनिकी शिक्षण हे क्षत्रियांना अवश्य दिले जाई. शस्त्र व अस्त्र या दोन्ही बाबतीत त्यांची तयारी करुन घेण्यात येत असे. ते या विद्येत निपुण होतील हे पाहिले जात असे रामायण व महाभारत काल पर्यंत अशा प्रकारचे शिक्षण अव्याहत दिले जात असे. तसेच राज्य व्यवहार व शासना बद्दल ही माहिती दिली जात असे. राजनीती हे ही एक शिक्षणाचे प्रमुख अंग असे. या संबंधीचे उल्लेख या दोनही ग्रंथातून भरपूर आढळतात.

बुध्द व जैन काळात अरण्यातून मोठे स्तूप बांधून तेथे शिक्षणाची सोय करण्यात येत असे. प्रसार वाढला जसा माध्यमांचा विस्तारही वाढू लागला. मोठमोठ्या शिक्षण संस्था नावारुपाला आल्या. मोठाली विद्यापीठे स्थापन झाली. नालंदा तक्षशिला ही विद्यापीठे विशेष नावाजली. या विद्यापीठातील विद्वान मंडळी धर्म संस्कृती आदी प्रचारासाठी मोठ्या संख्येनी चीन जपान आदी देशात गेल्याबद्दलचे उल्लेखही आहेत. थोडक्यात या काळी शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार सर्व दूर होऊ लागला.

**शिष्याची दिनचर्या :**

या गोष्टी कसोशीने पाळल्या जात होत्या म्हणून विशेष महत्त्व दिले जात असे. ब्रह्मचर्य व्रताचे पालन आवश्यक होते. अपराधाबद्दलही नियम कडक असेच होते. अन्न शुध्द सात्त्विक व मोजके असे ते शांतपणे खावे, आधाशीपणे खाऊ नये असा दंडक होता. स्वावलंबनाला विशेष महत्त्व होते. त्या साठी भिक्षा मागावी लागे. या गोष्टीने शिष्याला अहंकार रहिततेचा पाठ आपोआप मिळत असे. आणलेली भिक्षा गुरुच्या स्वाधीन करावयाची असे. विद्यार्थी दशेतील हे एक अवश्य कर्तव्य म्हणूनच करावे लागे.तसेच गुरुची सर्व प्रकारे सेवा करावी लागे. पडेल ते काम करावे लागे. अंगण झाडणे, सर्वत्र स्वच्छता राखणे, पाणी भरुन ठेवणे इत्यादी बारीक सारीक कामे करावी लागत. गुरुची अवज्ञा हा महान अपराध मानला जात असे. हे सारे करुन रोजचा पाठ तयार करावा लागे. पहाटे उठून गुरुना वंदन करुन पाठ तयार केला जाई. दिवसा बरीच कामे असल्यास गुरु रात्री पाठ देत असे. अशा प्रकारे गुरुगृही बारा वर्षे तपश्चर्या करावी लागे तेव्हाच विद्यार्थ्याला जीवनाचे धडे व त्याच बरोबर योग्य शिक्षण प्राप्त होत असे.

गुरुगृही राहून अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्याला अन्तेवासी म्हणत. काही शिष्य गुरुच्या अनुज्ञेने अविवाहित राहून जन्मभर आश्रमात रहात त्याना नैष्ठिक असे म्हणत. तसेच अशा पध्दतीने राहणाऱ्या स्त्रियाना ब्रम्हवादिनी म्हणत.

महिन्यातून फक्त चार सुट्या मिळत असत शुक्ल आणि कृष्ण अष्टमी तिथीना आणि पौर्णिमा व अमावास्या या दिवशी अध्ययनाला सुटी असे. 'सुखार्थिन: कुतो विद्या विद्यार्थिन: कुत: सुखम्।' ही म्हण त्या काळी सार्थ होती असेच तत्कालीन शिष्य जगांच्या दिनव्रताकडे पाहून म्हणावे लागते. ज्ञान संपादनासाठी हे आवश्यकच होते कारण हे एक व्रत आहे असेच मानले जात असे.

**विविध प्रकारचे शिक्षण :**

बारा वर्षाच्या कालावधीत विद्यार्थ्याला वेद पठणाबरोबरच सहा वेदांगांचाही अभ्यास करावा लागे. तसेच तात्विक विषयही शिकवले जात. न्याय, मीमांसा, तर्कशास्त्र, इतिहास, आख्यान, यज्ञवेळी सांगण्यात येणाऱ्या कथा आणि उपकथा, व्याख्यान, टीका, गाथा, संगीत, सामूहिक गान (वृंदगान) शस्त्र विद्या, राजे लोकांसाठी राजकीय विषयक शिक्षण, गंधर्व विद्या, राशी म्हणजे गणित नक्षत्र, विद्या खगोल शास्त्र, भूत विद्या, पदार्थ शास्त्र, सर्प विद्या, दैव (भविष्य कथन) पित्र (पितराना उद्देशून करण्यात येणारी कर्मे) सूत्र (यज्ञ विषयक माहिती) देवता ज्ञान, आरोग्य ज्ञान, इत्यादी. शिष्य परत्वे शिक्षण दिले जात असे. त्या काळी प्रचलित असलेले सारे शिक्षण देण्याची व्यवस्था होती. संगीत व नृत्य आदींचे पाठही दिले जात असत, स्त्रियांना हे शिक्षण घरीच आई वडिलांकडून मिळे. काही स्त्रिया गुरुगृही पण रहात त्यांचे पण त्या वेळी उपनयन केले जात असे. पुरा कल्पे तु नारीणां मौंजीबंधन मिष्यते. त्यांचे व्रत त्यानाही पाळावे लागे असा उल्लेख आढळतो.

गंधर्व वेद हा उपवेद मानला जात असल्याने संगीत/ नृत्य यांचे यथार्थ शिक्षण दिले जात असे. दुंदुभी वीणा आदी पुरातन वाद्ये आज अस्तित्वात आहेत. तत्कालिन सप्तस्वर सांप्रतच्या संगीत शास्त्राशी अनुरुप असेच आहेत. त्याकाळी आठ हजार संगीत रचना होत्या. पैकी बृहत् व रथन्तर या दोन रचना ऋग्वेदा संबंधी होत्या. वेद पठण उदात्त, अनुदात्त व स्वरित या पध्दतीने म्हटले जात होते. उदात्त स्वर - निशाद, गांधर्व, - अनुदात्त - ऋषभ, धैवत, स्वरित - षडज्, मध्यम, पंचम या बद्दलचा श्लोक असा आहे. **उदात्ते - निषाद गंधर्वा अनुदात्ते ऋषभ धैवतौ । स्वरित प्रभवा होते षडज् पंचम मध्यमा:** ॥ तसेच सप्त स्वराशीही जुळणी केलेली आहे. उदात्त स्वर - नी, ग अनुदात्त - री,ध, स्वरीत, सा, म, प. ह्या बद्दलचा श्लोक - उचौ निषाद गंधर्वौ नीचा वृषभ धैवतौ। शेवास्तु स्वरितो ज्ञेया: षडज् मध्यम पंचमा: ॥ या वरुन सप्त स्वर ज्ञात होते व त्यांचे योग्य शिक्षण दिले जात असे.

या शिक्षणातून माणसाचे व्यक्तिमत्त्व घडावे. त्याला अनंताचे ज्ञान व्हावे ही महत्वाची गोष्ट साधली जात असे. त्याची बौध्दिक वाढ होत असे. प्रयत्न शील रहाणे व अथक परिश्रम करणे हे शिष्याचे कर्तव्य बनले होते. गुरु हा केवळ मार्गदर्शक असे.

**समावर्तन - शिष्याला निरोप**

शिष्य म्हणून स्वीकारताना गुरु शिष्याला उद्देशून म्हणत असे - तुझे हृदय माझ्या हृदयात राहो. माझे मन तुझ्या मनात वास करो. माझ्या वाणीने तुला आनंद प्राप्त होवो. तू माझ्याशी एकरुप हो तुझे विचार माझ्या सारखेच होवोत मी शिकवीत असताना सावधान चित्ताने श्रवण करणारा हो. शिक्षण समाप्तीनंतर समावर्तन हा विधि होत असे त्याला स्नातक विधी असेही म्हणतात. त्या वेळी गुरु त्याला उपदेश करीत असे. या येथील वास्तव्यात तुला जे शिक्षण मिळाले ते तुझ्या पुढील आयुष्यात उपयुक्त ठरो. तुझा योगक्षेम नीट चालून अंती तुला मोक्ष प्राप्त होवो. या पुढे तू समाजात वावरणार आहेस. त्यावेळी तुझा व्यवहार

योग्य असावा या साठी मी सांगतो त्याची सतत आठवण ठेव. नेहमी सत्य तेच बोल (सत्यं वद) तुझे कर्तव्य कर (धर्मं चर) अध्ययनात टाळाटाळ करु नकोस (स्वाध्यायात् मा प्रमद) वेदाचे ज्ञान नित्य नूतन ठेव. तुझा वंश खुरटणार नाही वा कुंठित होणार नाही याची काळजी घे. लौकिक संपतीचा अव्हेर करु नकोस. शिकवलेले विसरु नकोस. अग्निकार्य नित्य कर. देव आणि पितराना संतुष्ट ठेव. तुझी माता तुला श्रेष्ठ स्थानी असो (मातृदेवो भव) तुझा पिता तुला देवस्थानी राहो (पितृदेवो भव) अतिथीला देवा समान मानून त्याचा आदर करत जा (अतिथि देवो भव) तुझा गुरु हा जीवनात श्रेष्ठता प्राप्त करुन देणारा अधिष्ठाता होवो (आचार्य देवो भव) आम्ही जे काही उचित आचरिले असेल तेवढ्याचेच अनुकरण कर. 'यानि न: सुचरितानि तानि एव आचरणीयानि'। निंद्य गोष्टींचे अनुकरण करु नकोस. 'नो इतराणि ।' तुझ्या आसमंतात विद्वान मंडळी असतील त्यांचा आदर कर. जे काही दान करशील ती श्रध्दा युक्त अंत:करणाने कर. त्या गोष्टीने तुला सात्विक आनंद झाला पाहिजे. तुझा विनय वृध्दिंगत झाला पाहिजे. भीतीने कोणतेही दान करु नकोस. श्रध्दा देयं । अश्रध्दया न देयं । भिया देयं । तुझ्या मनात शास्त्रार्थाबद्दल कोणतीही शंका निर्माण झाल्यास ती विद्वानाकडून निरसन करुन घे, आदराने त्यांचे म्हणणे ऐकून घे आणि त्या प्रमाणे आचरण कर. हे सारे लक्ष पूर्वक ऐक. पुढील आयुष्यात या प्रमाणे वाग, हाच गुरुचा संदेश. हाच उपनिषदातील शिक्षणाचा भाग आणि हीच वेदाज्ञा. कर्तव्यबुध्दीने या साऱ्या गोष्टींचे नीट पालन कर.

वरील उपदेशात अनेक मूलभूत गोष्टी गुरु शिष्याला सांगत आहे. गृहस्थाश्रमातील कर्तव्ये योग्य पध्दतीने पार पाडून अंती मोक्षाचा वाटेकरी हो, हा उदात्त विचार या उपदेशात आढळतो. गृहस्थाश्रमात देखील सर्व कर्तव्ये जाणीव पूर्वक पार पाडावयाची असतात. ती पार पाडताना अध्ययनात हयगय होता कामा नये असेही बजावलेले आहे. या उपदेशाचा संकलित विचार केला असता गृहस्थाश्रमात किती काटेकोरपध्दतीने वागावे लागते याची कल्पना येईल. या प्रकारे जीवन व्यतीत करण्याची आजही नितांत आवश्यकता आहे, हा उपदेश अत्यंत मौलिक स्वरुपाचा आहे.

यानंतर शिष्य अभ्यंगस्नान करी. चांगले कपडे घाली, गुरुला वंदन करुन त्याची घरी जाण्यासाठी अनुज्ञा घेत असे. घरी जाण्यापूर्वी गुरुला आपल्या कुवती नुसार क्वचित् प्रसंगी गुरुच्या इच्छेनुसार शिष्य गुरुदक्षिणा देत असे. गुरुची इच्छा व शिष्याची ऐपत जुळत असे. काही वेळा शिष्य राजे लोकाकडून धन मागून आणत असे व गुरुची इच्छा पूर्ण करीत असे. रघुवंशात कालिदासाने एका प्रसंगाचे वर्णन केले आहे. रघुराजाकडे वरतन्तु ऋषींचा शिष्य कौत्स गुरुदक्षिणा मागण्यासाठी गेला होता त्या प्रसंगाचे चित्रण केले आहे.

वरील विवेचनावरुन तत्कालिन शिक्षण, शिक्षणाची दिशा, शिक्षणाची सोय, शिक्षणाचा मुख्य हेतु, शिक्षणोत्तर उत्तम नागरिक म्हणून पदार्पण करण्यापूर्वी गुरुपदेश, गुरुला देण्यात येणारी दक्षिणा, विद्यार्थी दशेत पाळावयाची पथ्ये, इत्यादी गोष्टींचा विचार सूत्ररुपाने या लेखात मांडण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. वेद, उपनिषदे, स्मृतिग्रंथ, जैन, बौध्द, आदि वाङमय तसेच रामायण महाभारतादी महाकाव्ये या साऱ्या ग्रंथांचे अवलोकन केल्यास कितीतरी उद्बोधक माहिती उपलब्ध होऊ शकेल. जिज्ञासूनी अभ्यास पूर्वक ही माहिती मिळवावी.

- शं.बा.मठ
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

•••

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधने

*वैश्विक रचना, विश्वसंकल्पना यांच्या दृष्टीने भारतीय संस्कृतीचा विचार मांडणारा हा सातवा लेख, विषयाची संगती लागण्याच्या दृष्टीने वाचकांनी हे सर्व लेख एकत्रित ठेवावेत ही विनंती - संपादक*

## संस्कृतीचे वैदिक बीज

दिशाच्या मागील काही अंकात आपण भारतीय संस्कृतीच्या वैशिष्ट्यांचा व विशेषतः तिच्या बीजासंबंधी विचार केला. मी मोठ्या आग्रहाने हे बीज 'वैदिक स्वरुपाचे आहे', अशी मांडणी केली. याचा अर्थ हा की ह्या भारतीय संस्कृतीच्या अविष्काराची जी सर्व काही स्वरुपे दृश्य व अदृश्य स्वरुपाची-तिच्या संस्काराखाली जगणाऱ्या भारतीय समाजाच्या जीवन व्यापारात, चाली रिती, धर्म संकल्पना, आचार विचार, साहित्य, कला आणि सामाजिक, राजकीय वा आर्थिक व्यवहारात पहातो, त्यांचा उगम व संकल्पना ह्या मूळ वैदिक बीजांत सूक्ष्म स्वरुपात अस्तित्वात आहेत. शिवाय त्या ह्या विश्वाच्या 'अव्यक्त भागांत' आहेत (संदर्भ पुरुषसुक्त व भगवद्‌गीता) व त्यांचा आविष्कार (Manifestation) ह्या दृश्य स्वरुपात, व्यक्त स्वरुपात ह्याच्या एक चतुर्थांश भागातील विश्वाच्या ह्या सूर्यमालेच्या 'पृथ्वी' नावांच्या गोलावर पहावयाला मिळतो.

## संस्कृतीचा हेतू

आता एक मुद्दा महत्वाचा आहे. तो हा की या बीजापासून दृश्य जगांत विस्तार पावणाऱ्या संस्कृतीची स्वरुपे कशी ओळखावयाची. विशेषतः त्या विस्तारित अशा स्वरुपात पृथ्वीवरच्या वातावरणाच्या शक्तीचा अंमल किती व बीजांतील शक्ती व संकल्पनेचा अंशात्मक भार किती ? शिवाय सर्वात महत्त्वाचा प्रश्न हा की ह्या विस्ताराचा - म्हणजे ह्या संस्कृतीच्या व्यापाचा हेतू काय ? कशासाठी हा उपद्व्याप अंगीकारावयाचा ?

## भौतिक ते स्पिरीच्यूअल :

ह्या प्रश्नांत भारतीय भूमिका कोणती हे आपण नंतर बघू या. पण, विशेषतः 'भौतिकवादी विचार धारेतील संस्कृत्या' आज ह्या विषयावर कोणता विचार मांडीत आहेत याचा अगदी त्रोटकपणे विचार करु या. माझ्या ह्या उद्योगाचा हेतू हा आहे की 'वेदांच्या' भूमिकेचा यथातथ्य विचार करण्याच्या व जाणण्याच्या योग्यतेला आजचा समाज पूर्णपणे अनुकूल व सार्थ नाही व त्याला त्याच्या भौतिक पातळीवरुन स्पिरीच्यूअल पातळीवर नेण्यास हा अभ्यास आवश्यक आहे.


## वैदिक ज्ञानशास्त्र

ह्याचे मुख्य कारण म्हणजे ह्या पृथ्वीवर जन्मलेल्या प्रत्येक जीवाचा ताबा, संघटित अशा 'सेक्यूलर, इंडस्ट्रियल (वैश्य) व्यापारी वृत्तीच्या' भोगवादी वृत्तीच्या, राज्यसरकारांनी घेतला जात आहे - तो जसे निरनिराळ्या 'नेशन - स्टेटस्‌मध्ये' (Nation States) विभागला गेला असला तरी 'स्पिरीच्यूअल संकल्पनेच्या' विरुध्द ही सत्ता अधिकार मिळवून बसली आहे, आणि, विशेष म्हणजे आपल्या अनेक तऱ्हेच्या 'शिक्षण संस्था' ध्येय धोरणे व रचना हया 'वैदिक संस्कृती' मानणाऱ्या नाहीत, एवढेच नव्हे तर वैदिक ज्ञानपध्दति (Vedic Epistemology) च्या विरोधातच संघटित आहेत तरी भौतिकवादी दृष्टिकोनात वाढलेल्या आपणाला आध्यात्मिक (Spiritual) विचारपध्दतीतील क्षमता ह्या अभ्यासातून व निराकरणातून मिळवावी लागेल.

## सांस्कृतिक भौतिकवाद पार्श्वभूमी

मग कोणत्या आहेत त्यांच्या विचारपध्दती व धारणा? सोबत एक 'सांस्कृतिक भौतिकवाद' ह्या सू क्यूंग लिम (Soo Kyung Lim) ह्यांच्या लेखातील चित्र नं. १ घेतले आहे. त्यांतील 'मारविन हॅरिस' (Marvin Harris) ह्यांच्या 'सांस्कृतिक भौतिकवाद' ह्या सारभूत वैचारिक तत्त्वज्ञानाच्या भूमिकेला अंशतः कारणीभूत होणाऱ्या दुसऱ्या अनेक विचारप्रवाहांचा मार्ग दाखविला आहे.

1. Cultural Evolution - White
2. Cultural Ecology - Steward
3. Emics and Etics - Pike
4. Diatetic Materialism - Hegel
5. Historical Materialism - Karl Marx
6. Behavioral Psychology - Skinner



चित्र नं. १

हे चित्र काय दर्शविते? मिस्टर मारविन हॅरिस ह्यांच्या प्रसिध्द 'सांस्कृतिक भौतिकवाद' ह्या 'तत्त्वज्ञान' ह्या स्वरुपाच्या निष्कर्षापर्यंत नेणाऱ्या समाजातील निरनिराळ्या पंडितांच्या किंवा विचारवंतांच्या संस्कृतीच्या घडणीबद्दल, कार्यकारण सूत्रांबद्दल मांडलेल्या विशेष अशा विचारधारेतून 'सांस्कृतिक भौतिकवाद' ह्या मांडणीकडे हॅरिस कसे पोचले याचा ऐतिहासिक संदर्भ आपल्याला पहावयाला मिळतो ! ह्या प्रत्येक वैशिष्ट्यपूर्ण विचारात आपल्याला ह्या ठिकाणी वेळेअभावी शिरावयाचे नाही, तर, हॅरिस ह्यांच्या निष्कर्षाचाच परामर्ष घ्यावयाचा आहे. नंतर, आपल्याला 'संस्कृतीच्या व्यापाराबद्दल' (operation) भारतीय स्पिरीच्यूअल विचार काय आहे, तो मांडावयाचा आहे.

## पिल्लावळ - :

आपण स्वतःला भारतीय मानत असलो तरीही आपण शिक्षणाने, जीवन आचार विचार पद्धतीने व बुध्दीच्या विशिष्ट पण सामान्य तर्कपध्दतीने पाश्चिमात्य संस्कृतीचीच 'पिल्लावळ' आहोत. हे पक्के लक्षात ठेवावयाचे आहे. 'वैदिक विचारच' आपल्याला परके वाटण्याचा खूप संभव आहे. म्हणूनच, ह्या भौतिक 'पॅराडिमच्या' पिंजऱ्यातून आपल्या बुद्धीला 'सम्यग् दर्शनाकडे' जावयाचे आहे किंवा नेण्याचा माझा निर्धार आहे.!!

'The rise of Anthropological theory' ह्या 1968 च्या आपल्या ग्रंथात हॅरिस म्हणतात की,

> "primary task of anthropology is to give causal explanations for the differences and similarities in thoughts and behaviors of human groups."

Anthropology म्हणजे 'मानवशास्त्र'. (Science that deals with (origin, development, races, customs and beliefs of ) mankind.) हे शास्त्र-उगम, वृद्धी, वंश, आचार पद्धती, विश्वास वगैरेंचा मानवजातीतच असलेल्या गोष्टींचा विचार व कारण परंपरेची चिकित्सा करते.

## मार्क्सिस्ट लोकायतवादी विचार

कार्ल मार्क्स हा म्हणाला होता की ''ज्या

तत्त्वज्ञानाचा समाज बदलण्यासाठी उपयोग होत नाही, त्या तत्त्वज्ञानाचा मला काहीही उपयोग नाही.'' या एव्हढी समाजपरिवर्तनासाठी प्रामाणिक व सुस्पष्ट भूमिका क्वचितच झालेली पहावयाला मिळेल. त्यामुळेच मार्क्सच्या ह्या 'दर्शनाचा' प्रभाव जगावर पडला. पण त्या 'दर्शनातून' उदयाला आलेल्या समाजपरिवर्तनाचा जो काही 'बट्याबोळ' झाला तो रशिया व चीन या दोन मुख्य देशांत पहावयाला मिळाला.

ह्या पराभवाचे मुख्य कारण ह्या मार्क्सिस्ट दर्शनाच्या 'अपूर्ण स्वरुपातच' आहे. 'वैश्विक सत्यता' (cosmic reality) ही फक्त भौतिक स्वरुपात आहे, हा विश्वास चुकीचा आहे. ह्याचे मुख्य आधार ही 'भौतिकवादी आधुनिक विज्ञान' व 'लोकायतवादी' इतिहास दर्शनात आहेत. (कॉ. देवीप्रसाद चट्टोपाध्याय यांच्या "Lokayat" ह्या ग्रंथाचा संदर्भ) Marx writes that "It is not the consciousness of men that determines their being, but on the contrary, their social being that determines consciousness हा पूर्वेतिहास व कुळ सांगण्याचे कारण हेच की ''कल्चरल भौतिकवाद'' (Cultural Materialism) ह्या 'मारविन हॅरिस' यांच्या मानवी संस्कृतीच्या संदर्भातील 'दर्शनाचा' - तत्त्वज्ञानाचा आधार ह्या पार्श्वभूमीवर आहे. काय आहे हा सांस्कृतिक भौतिकवाद ?

"Cultural Materialism is a scientific research strategy that prioritizes material behaviour and etic processes in the explanation of the evolution of human socio-cultural Systems."

''सामाजिक-सांस्कृतिक मानवी उत्क्रांती तत्त्वात भौतिक जीवन आचार पद्धति व ''एटिक'' पध्दती ह्याचा अग्रक्रम व प्रभाव आहे. हे मानणारी व वापरणारी वैज्ञानिक संशोधनपद्धती म्हणजेच ''सांस्कृतिक भौतिकवाद'' होय''.

ह्या विचारधारेवर जरी काही विरोधात्मक टीका झाल्या आहेत, तरी देखील आजच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक प्रचलित पद्धती ह्याच विश्वासावर आधारलेल्या दिसतील. मारविन हॅरिस ह्यांच्या सांस्कृतिक भौतिकवादाचा आधारस्तंभ हा कार्ल मार्क्सच्या ''इंफ्रास्ट्रक्चर, स्ट्रक्चर व सुपरस्ट्रक्चर'' ह्या सिद्धांतावर आधारलेला आहे. ह्याचे चित्रमय स्वरुप सोबत छापले आहे. ह्यात आणखी एक बारकावा सांगावाच लागेल.




चित्र नं. २

**केनेथ पाईक :**

**केनेथ पाईक** ह्या प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञाने जमवलेल्या निरीक्षण सामुग्री व माहिती यांच्या पृथक्करणाच्या पद्धती मांडल्या. त्या "Tagmemic Discourse Principles'' म्हणून प्रसिद्ध आहेत. भाषेवर आधारलेल्या ज्ञानशास्त्रात जास्तीत जास्त दोषरहित अशा निष्कर्षांच्या प्राप्तिसाठी त्या मांडल्या आहेत. विचारधारेची एक प्रकारची checklist (पडताळ्यांची यादी) मांडली आहे. त्यातच 'एटिक' व 'एमिक' ह्या विशेष होत. आपल्या विषयांसाठी त्यांच्या व्याख्या इंग्रजीतच मांडणे योग्य ठरेल.

[Emics (phonemic) [(Etics (phonetic)

**Eticity** : Surface, distant, reality-as-appearance, outsider objectivity. Initial etic inquiry typically yields particles, whose wave or field relationships (i.e. situatedness) to other particles

are undetected, indistinct, or ambiguous and which must be identified before progress can be made towards emic understanding emicity : deeper, reality-as-experience, insider - Subjectivity., Etici inquiry, informed by incrementally more accurate and comprehensive account of particles as understood and experienced within wave/field relationships by insiders, fields ever closer approximation of jalienl meaning.

ह्यावरुन एक दिसेल की समाजशास्त्राच्या अभ्यासात ''इन्फ्रास्ट्रक्चरल'' बैठक व रचना हीच समाजाचे सुपरस्ट्रक्चर मधील 'आविष्कार' ठरविते.


आपल्या भारतीय संस्कृतिच्या दृष्टिकोनातून, हा जो अभ्यास ''बहिर्गत'' व अंतर्गत'' फरक दाखवण्याचा प्रयत्न करतो. त्या संबंधात 'अंतर्गत' म्हणजे नक्की काय ह्याचा पत्ता ह्या भौतिकवादी, निरीश्वरवादी, पृथक्करणांत सांपडत नाही.

कारण योगिक 'अंतर्मुखता', 'अनुभुतीवर' आधारलेली (Realisation) व 'साक्षात्कारी दर्शनाचा', ह्या 'अंतर्गत' भौतिकवादी दृष्टीच्या प्रांतात ठिकाणा लागत नाही. ह्या पध्दतीच्या ज्ञानपध्दतीचा मार्ग भौतिकवाद्यांना माहीत नाही. त्यामुळे भारतीय संस्कृतीच्या ज्ञानशास्त्राच्या (Epistemology) बैठकीचा या पाश्चात्य विचारवंताना स्पर्श नाही.

**चैतन्याचा वैश्विक प्रवास**


ह्याचे कारण 'मानवी जीव', वैश्विक सत्-चित्-आनंद ही रचना, विश्वनिर्मीतीच्या मूळ शक्तीच्या **इच्छा शक्ती, ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती**' ह्या 'बीजात्मक' संकल्पनेचा स्पर्श त्यांच्या समाजशास्त्राच्या विचारमंथनात बिलकुल सापडत नाही.

ह्या विश्वाची रचना, पृथ्वी ग्रहाचे स्थान, 'मानवी जीवाचा' ह्या विश्वात संचार व त्याच्या वैश्विक कालक्रमणेत




चित्र नं. ३

पृथ्वीवरच्या अस्तित्वाचा, आगमनाचा व निर्वाणाचा अर्थ जोपर्यंत निश्चित होत नाही तोपर्यंत समाजशास्त्राचा विचार हा अपूर्ण व तोकडा आणि दिशाहीन, अवास्तव व भरकटणारा असाच असणार व रहाणार हे निश्चित. त्याची थोडी कल्पना "Life's Journey" ह्या चित्रावरुन यावी. ह्या पृथ्वीच्या **'प्लॅटफॉर्मवर'** सतत नवीन जीवांचे आगमन-जन्म व जवळजवळ १०० वर्षांच्या वास्तव्यानंतर बहिर्गमन होते ही परिस्थिती सतत डोळ्यासमोर ठेवली पाहीजे. अशा ह्या 'Temporary' अल्पकालीन वास्तव्याचाच एक ''तात्पुरता समाज'' बनत असतो व आपल्याला ह्या समाजाच्या संस्कारांचा, मूल्यांचा संस्कृतीचा अभ्यास अभिप्रेत आहे.




चित्र नं. ४

दुसरे चित्र आणखी एक भारतीय संकल्पना दाखवते. हा आहे 'Universal Motion Diagram' व तो "Venn diagram" ह्या पद्धतीत चितारला आहे.

**गुणशास्त्रीय प्रभाव :**

हे जग व्यक्त (Manifest) व अव्यक्त भागात वाटले गेले आहे. हा संदर्भ मागील लेखांमध्ये विस्ताराने मांडलाच आहे. ह्याला 'पुरुषसुक्ताचा' आधार आहे. ही पृथ्वी एका ''आत्मतत्त्वाने'' स्वतःभोवती व सूर्याभोवती फिरत आहे. तिच्यावर चंद्र (स्वतःभोवती फिरण्याऐवजी पृथ्वीकडे सतत एक चेहरा ठेवून फिरत आहे) शिवाय सूर्य एका मोठ्या ताऱ्याभोवती जवळजवळ २६,००० वर्षाच्या फेरीचक्रात गुंतला आहे व ही पृथ्वी व चंद्र ह्यांना बरोबर घेऊन ही 'परिक्रमा' आहे. पण, ह्या '**खगोल गतीची**' जरी थोडी कल्पना पाश्चात्य विज्ञानाला असली, तरी आणखी एका '**अंतरिक्ष गती**' ची कल्पना त्यांना बिलकुल माहीत नाही. ह्या गतीचे वर्णन '**गुणशास्त्राच्या**' आधाराने होईल. हे शास्त्र आज लुप्त झाले आहे. पण त्याचा अर्थ आपल्या समाजशास्त्राच्या संदर्भात प्रामुख्याने हा आहे की विश्वातील ह्या भ्रमणात ज्या निरनिराळ्या क्षेत्रांतून हा प्रवास होतो आहे, त्यांतील विशिष्ट 'गुणांचा' प्रभाव ह्या पृथ्वीवर अवतरणाऱ्या जीवसृष्टी व इतर बाबींना भोगावा लागतो. ही आहे 'युग भ्रमणाची' संकल्पना (सत्ययुग, त्रेतायुग, द्वापार, कलियुग वगैरे) ह्या भ्रमण यात्रेतील पृथ्वीला जवळजवळ २१०० वर्षे लागतात एका युगातून दूसऱ्या युगात जावयाला, ह्या भ्रमणाचे गुणात्मक प्रभाव पृथ्वीवरच्या जीवनावर पडत असतात.

आता प्रश्न हा आहे की 'सत्याचा शोध' व 'समाजशास्त्राच्या परिवर्तनाचा' वा उत्क्रांतीचा घोष करणाऱ्या समाज शास्त्रज्ञांनी ह्या 'भारतीय दर्शनाचा' योग्य तो विचार व दखल घ्यावयाला हवी का नको? जर त्यांच्या सत्य जाणण्याच्या फूट पट्ट्यांमध्ये हे दर्शन उत्तीर्ण होत नसेल, तर, मग त्यांच्या स्वतःच्या दर्शनाच्या अपूर्णतेची जाणीव तरी त्यांनी ठेवावयाला हवी की नको?

''वैदिक शास्त्र'' ह्या सोंवारी महाराज ह्यांच्या दर्शनातला हा भाग पहा :-

''आमच्या ज्योतिषशास्त्राच्या अनुसार आकाश अनंत आहे. याच्या भिन्न भागात स्वत्वादी गुणाचे परिणाम ही भिन्न भिन्न असतात. त्यातूनच पृथ्वीस भ्रमण करावे लागते. पृथ्वीच्या ह्या गतीस **''अंतरिक्ष गति''** म्हणतात. या अनंत आकाशात अनंत प्रकारचे नक्षत्र, तारा ग्रह भिन्न भिन्न गतीने फिरत असतात. त्यामधूनच पृथ्वीस फिरावे लागते. पृथ्वीच्या ह्या गतीस '**खगोलिक**' म्हणतात.

प्राचीन काळात आचार्य लोक 'गुणशास्त्र व ज्योतिषशास्त्र यांच्या बळावर **वर्षफलाची सूचना** अगोदर देत असत.'

**अक्षम्य अपराध :**

विश्वातील ह्या अफाट, गहन जीवनाची, गतींची, उद्दिष्टांची **केवळ एकांगी, अभिनिवेशी व केवळ फिजिक्स व मॅथमॅटिक्स ह्या तर्कपद्धतीने मांडणी व शोध घेण्याचे प्रयत्न, हे जे भौतिकवादी करत आहेत, त्याने वस्तुस्थितीचा अपूर्ण आढावाच आपल्या हाती लागत आहे.** वैदिक संपूर्ण, सम्यग् व स्पिरीच्यूअल दृष्टिकोनावर अज्ञानाने, अनुल्लेखाने व पूर्वग्रहाने दूषित असा बहिष्कार टाकल्याने मानवी समाज एका परिपूर्ण दर्शनापासून दूर ठेवला जात आहे. हा एक अक्षम्य अपराध 'मानवी संस्कृतीच्या ऐतिहासिक प्रवासात नमूद करावा लागेल. ह्या लोखंडी बेड्यातून ह्या समाजाला मुक्त करावे लागेल. मानवी जीवनाला वैश्विक सत्याच्या भूमिकेप्रत नेण्यासाठी ह्या प्राणितत्त्व Animal instinct अशा भूमिकेतून प्रयत्नपूर्वक मुक्त करावे लागेल. हाच खरा '**मोक्षमार्गावरील प्रवास**' आहे. हे सामर्थ्य भारतीय

संस्कृतीत व ज्ञानात पूर्णपणे आहे. ह्या ज्ञानावर जो 'मल' आहे (काश्मिरी शैव दर्शन) तो सामाजिक प्रयत्नाने दूर करावा लागेल. त्यासाठी जन्मजन्मांतरीच्या आध्यात्मिक संस्काराची 'स्पिरीच्यूअल' शिक्षणाची अनंतकाळाची संस्था ह्या पृथ्वीवर जागृत व कार्यरत करण्याची जबाबदारी ह्या युगाची आहे.

**Relay Race of Human Knowledge**

ह्या जबाबदारीची विभागणी दोन तीन प्रकारांनी बघावयाला लागेल. एक तर डायनॅमिक (Dynamic) किंवा 'जीव-चैतन्य-सातत्याची' पृथ्वीवरच्या समाजाची कल्पना वा वस्तुस्थिती आहे, त्या वास्तवावर मानवी संस्कृतीची धारणा व रचना व प्रगती ही कोणत्या आधारावर होणार? 'रिले रेस' सारख्या 'बॅटन' चे हस्तांतर सातत्याने समाजात होत राहिले पाहिजे. त्या बॅटनच्या आकारात, वजनात व रंगरुपात ही सारखी वृध्दी होत रहाणार आहे. ह्या पृथ्वी क्षेत्रावर येणाऱ्या नवनवीन जीवांना किंवा हा 'Floating Society' च्या नवीन घटक मेंबर्सना मागील खेळाडूंनी जपून आणलेल्या 'बॅटन'चे संपूर्ण आकलन होणे आवश्यक आहे व त्यांत ह्या बॅटनच्या पुढच्या प्रवासाची जबाबदारी सध्याच्या समाजावर आहे. - इथपर्यंत की त्याचे भविष्यातील नवीन समाजाकडे हस्तांतर व्हावयाला हवे.

हे कशासाठी तर हे गहन, गूढ वैश्विक रहस्य उलगडण्यासाठी व कदाचित ह्या धडपडीत वा लढाईत स्वतःची रहस्ये - स्वतःच्या फॉर्मची रहस्ये, उद्दिष्टे व भविष्य प्राप्त करण्यासाठी.

**संस्कृतिचक्र**

हे काम 'संस्कृतिचक्र' करत आले आहे. पण हे चक्र Linear सरळ रेषेत चालणारे नाही. त्यात क्षेत्रबदल, पातळी बदल वा 'लोक' (सत्यलोक) बदलही अंतर्भूत आहे. तेव्हा ह्या पृथ्वीवरील 'शिक्षण संस्था' ही जबाबदारी उचलू शकतील ह्या क्षमतेच्या असावयाला हव्यात - नाही का ?

मग, त्यांचे सध्याचे स्वरुप हे निव्वळ भौतिकवादी, **'भौतिकसुखाच्या उपयुक्ततावादी'** ह्या स्वरुपात सिमीत राहून चालणार नाही. एव्हढेच नव्हे तर मानवी बुद्धी, आयुष्य, प्रवृत्तिदोष, इंद्रियांची सत्यदर्शनाची सीमीत क्षमता ह्यावर मात करणाऱ्या एखाद्या किंवा अनेक ज्ञानसंपादनाच्या शास्त्रांच्या योग्य उपयोगावर आधारलेल्या प्रयत्नाच्या असावयाला हव्यात.

**शिक्षणसंस्थांना आव्हान**

प्रचलित 'शिक्षणपध्दती' ही आव्हाने स्वीकारत नाही. एव्हढेच नव्हे तर ती तोकडी, एकांगी व विशेषतः भौतिक राजकारण व अर्थकारण ह्यात अडकलेली वा त्यांत प्रभारित अशी आहे.

म्हणूनच 'भारतीय संस्कृती' जी वेदबीजावर आधारलेली आहे, त्या संस्कृतीत शिक्षण (Learninng) ही जबाबदारी कशी हाताळली आहे त्याचा विचार आवश्यक आहे.

पुढच्या लेखात हा विचार सविस्तरपणे करु या.

**यशवंत साने**
स्पिरीच्यूअल, सायन्स सेंटर, ठाणे.
सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँके शेजारी,
अग्यारी लेन, ठाणे - ४०० ६०१.
टे. नं. ०२२-२५३६८४५०
E.mail.: yrsane@eth.net

•••

# अण्णांच्या आठवणींचे 'रेंगाळणारे सुगंध'

*२००५ हे वर्ष अनेक दृष्टींनी महत्त्वाचे आहे. ग. बा. तथा अण्णा ताम्हाणे यांचे हे जन्म शताब्दी वर्ष ! आण्णांचे 'कोकणची पाऊलवाट' हे आत्मचरित्र आवर्जून वाचावे असे आहे. आण्णांच्या सहवासातील नागरिक चे संपादक व दिशाचे हितचिंतक श्री. माधर शिरवळकर यांचा लेख या निमित्ताने दिशा च्या वाचकांसाठी देत आहोत. बांदोडकर महाविद्यालयाच्या ग्रंथालयात कनिष्ठ महाविद्यालाच्या ग्रंथसंग्रहात आण्णांचे आत्मचरित्र आहे. इच्छुकांसाठी त्याचा दाखल अंक - १४७५- संपादक*

पंचवीस डिसेंबर एकोणीसशे पाच हा अण्णांचा म्हणजे ग. बा. ताम्हणे यांचा जन्मदिन. आज अण्णा असते तर शंभर वर्षांचे असते. शतायुषी झाल्याबद्दल २५ डिसेंबर २००५ रोजी त्यांच्या 'प्राची' (मुलुंड पूर्व) येथील निवासस्थानी गेलो असतो तर अण्णा नक्की म्हणाले असते ''आलात? आता माझी शंभरी भरली.'' त्यांच्या हा कोटीवर आलेलं हंसू आवरण्याच्या आत अण्णा त्यांच्या जवळच्या खुर्चीकडे हात करीत पुढे म्हणाले असते, ''असे इथे या, तुमच्याशी बोलायचंय.''

खरं तर अण्णांना जाऊन आता ५ वर्षे होऊन गेली. हा काळ माणसाला स्मरणातून 'डिलीट' करायला पुरेसा समर्थ आहे. पण अण्णांच्या आठवणींपुढे काळ 'हँग' झाला, आणि त्यांच्या आठवणींचे रेंगाळणारे सुगंध स्मरणात ताजे राहिले. १९६८ साली मी मुलुंडला रहायला आलो आणि इयत्ता आठवीत पुरंदरे हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. त्यानंतर थोड्याच दिवसांनी सुयोग सोसायटी सभागृहात झालेल्या एका कार्यक्रमात मी अण्णांना पहिल्यांदा पाहिलं. त्या कार्यक्रमात केलेल्या भाषणात अण्णांनी स्वतःच्या बुटक्या मूर्तीची केलेली खुसखुशीत चेष्टा आणि मग त्या पाठोपाठ आलेल्या शब्दांच्या गंमतीदार कोट्या माझ्या डोळ्यासमोर आजही येतात. त्या कार्यक्रमात त्यांना पाहिलं तेव्हा अण्णांशी माझी कधी काळी खूप निकट संबंध येईल हे स्वप्नातही नव्हतं.

मला १९७८ मधली गोष्ट आठवते. नेमका महिना आणि तारीख मात्र आज आठवत नाही. ठाण्याच्या मराठी ग्रंथ संग्रहालयात अतिशय चुरशीची निवडणूक होती. अध्यक्षपदासाठी माधव गडकरी उभे होते, मी कार्यवाहपदाचा उमेदवार होतो. मात्र, आम्ही सर्व कार्यकर्ते माधवराव गडकरी निवडून यावेत यासाठी रात्रंदिवस एक करीत होतो. एक एक मतदार गोळा करीत होतो. अण्णा १९५६ साली ठाण्याच्या मराठी ग्रंथ संग्रहालयाचे कार्याध्यक्ष होते, आणि संस्थेचे आजीव सदस्य होते. ''मी अण्णांना घेऊन येईन'' अशी जबाबदारी अंगावर घेतली. त्याप्रमाणे अण्णा संस्थेच्या सर्वसाधारण सभेसाठी माझ्या बरोबर आले. त्यांना समोर पाहून माधवराव गडकऱ्यांनाही खूप बरं वाटलं.

१९७८ साली झालेली ही आमची भेट अण्णा शेवटपर्यंत कधी विसरले नाहीत. खरं तर विसरणं हे अण्णांच्या गावीच नव्हतं. त्यांची स्मरणशक्ती अचाट होती. त्यातही त्यांच्या कवितांचं पाठांतर तर समोरच्याची दांडी गुल करील असंच होतं. मी दांडी 'गुल' हा शब्दप्रयोग वापरला याच्या मागेही एक आठवण आहे. एका स्थानिक संमेलनात (बहुधा कोकण साहित्य संमेलन असावे)

कवितेच्या भेंड्यांचा कार्यक्रम झाला. दोन गट झाले. दोन्ही गटात तुल्यबळ मंडळी होती. पण अण्णांचा गट जिंकला याचे कारण अण्णांनी समोरच्या गटाची दांडी दोनदा गुल केली. समोरच्या गटाने भेंड्यात 'अक्षर' मागितलं तेव्हा अण्णा म्हणाले, ''थांबा, थांबा, मी अक्षर देतो. घ्या अक्षर ण.'' अण्णांनी 'ण' दिल्यावर सगळे आ वासून बघू लागले. 'ण' अक्षरावरून कुठली कविता असणार? स्वाभाविकच समोरच्या गटाची दांडी उडाली. अण्णांनी मग 'ण' वरून सुरु होणारी कविता खडखडा म्हणून दाखवल्यावर सगळे अक्षरशः 'मॅड' झाले. 'ण' प्रमाणेच त्यांनी एकदा 'ळ' हे अक्षरही दिले आणि पुन्हा बाजी मारली.

अण्णा आणि मुलुंड नागरिक हा संबंध अतिशय घनिष्ट होता, आणि शेवटपर्यंत घनिष्ट राहिला. अण्णांनी 'आनंदाचे डोही', नावाचे सदर 'नागरिक' मध्ये प्रदीर्घ काळपर्यंत लिहिले. एकदा त्यांचा एक लेख मला आवडला नाही. अण्णा वयाने, अनुभवाने, ज्ञानाने आणि लौकिक दृष्ट्या अशा सर्वच दृष्टीने मोठे. माझी पंचाईत झाली. 'लेख आवडला नाही' असं अण्णांना कसं सांगायचं हा प्रश्न होता. पण मी धीर केला. अण्णांकडे गेलो. त्यांना चाचरत आणि शब्दांचे चार चार वेढे घेत मुद्दा सांगितला. ''मला माहीत होतं, तो लेख जमलेलाच नाही. त्याऐवजी हा घ्या कवि अनिलांवरचा लेख.'' अण्णांनी माझी परीक्षा घेतली होती.

अण्णांच्या कोट्या धमाल असत. एकदा म्हात्रेगुरुजींच्या शाळेत एक कार्यक्रम होता. कार्यक्रमानंतर गुरुजींनी सर्वांसाठी बटाटावडा मागवला. प्रत्येकाच्या हातात एक एक प्लेट देण्यांत आली. प्लेटमध्ये प्रत्येकी दोन दोन वडे. अण्णा माझ्या शेजारी बसले होते. त्यांनी स्वतःच्या प्लेट मधला एक वडा माझ्या प्लेटमध्ये टाकला. ''का हो अण्णा, एकच वडा? भूक दिसत नाही?'' मी म्हणालो. त्यावर अण्णांनी चेहेरा गंभीर केला. म्हणाले, ''तसं नाही. मी बेवडा घेतला नाही.'' अण्णांना कोटी करण्याची संधी मिळाली आणि त्यांनी ती सोडली असं मला कधीच आठवत नाही.

अनेक वर्षे त्यांची दोन्ही डोळ्यांची दृष्टी गेली होती. त्यामुळे वाचन बंद झाल होतं. एखादा असता तर खचला असता, किंवा डोळे नाहीत म्हणून नशिबाला दोष देत बसला असता. पण अण्णा वेगळे होते. त्यांनी वाचन मंडळाचा उपक्रम सुरु केला. डोळे शाबूत असलेले सदस्य एकत्र केले. अशा प्रकारे वाचनाचा त्यांचा यज्ञ त्यांनी अखंडपणे चालू ठेवला. आपल्या दृष्टीहीनतेची वा अंधत्वाची जराशी देखील जाणीव दुसऱ्याला होणार नाही असे अण्णांचे सहज वर्तन असे.

'नागरिक' वर अण्णांनी मनापासून प्रेम केले. त्यात अक्षरशः डझनवारी लेख लिहिले. दिवाळी अंक हा त्यांचा विशेष आस्थेचा विषय. मला आठवतं १९९१ च्या अंकाचे काम सुरु होण्याचा सुमार होता. बहुधा जुलै महिना असावा. ध्यानीमनी नसताना सकाळी ११.३० च्या सुमारे अण्णा कुणाचा तरी हात धरून 'नागरिक' कार्यालयात आले. ''अण्णा, तुम्ही कशाला बाहेर पडलात, मी आलो असतो तुमच्याकडे'' मी म्हणालो.

''पाऊल वाकडं पडलं'' अण्णा म्हणाले. चेहेरा परत गंभीर. मग अण्णा म्हणाले, ''तुमचं यंदाचं दिवाळी अंकाचं काय आहे?''

''विचार करतोय.'' मी म्हणालो.

''मला मोठी जागा ठेवाल का?'' अण्णांनी विचारलं.

अण्णांनी त्या वर्षी 'नागरिक' च्या दिवाळी अंकात तो प्रदिर्घ लेख लिहिला. त्या लेखात इ. स. १८२५ ते १९९१ ह्या काळातील संस्कृती संवादांच्या माध्यमातून

चितारलेली होती. १६६ वर्षांच्या काळातील प्रमुख सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक व साहित्यिक घटना त्या संवादांमध्ये अण्णांनी गुंफल्या होत्या. ह्या संपूर्ण प्रदिर्घ लेखनाचा धागा मात्र त्या त्या काळच्या तरूणाईचा होता. १८२५ च्या पेशवाईनंतरच्या काळात शनिवार वाड्याची अवस्था न पहावणारे हरिपंत व कृष्णंभट हे दोन भिक्षुक गप्पा मारताना म्हणतात, ''आमचा वामन्या लहान का आहे?'' चौदावं वर्ष झालं त्याचं. घरात आई आहे, बायको आहे. पण आहे का काही काळजी? आज काळची पोरच बिघडली. आमच्या वेळी असं नव्हतं.''

हरिपंत व कृष्णंभटाची पुढली वंशावळ पुढे संवादात घेत घेत अण्णांनी प्रत्येक पर्वाच्या शेवटी ''आजकालची पोरच बिघडली आहेत. आमच्या वेळी असं नव्हतं'' ह्या वाक्यांनी शेवट केला आहे. प्रत्येक मागची पिढी पुढल्या पिढीला 'बिघडलेली' म्हणते आणि इतिहास पुढे जात राहतो असा तो विषय होता. त्यात फुले, आगरकर, विधवाविवाह, 'विलेक्ट्रीक' चे दिवे आल्याचं अप्रुप, 'गिरगावचे रस्ते म्हणे डांबरी होणार' इथपासून ते दुसरे महायुद्ध टिळक युग, जालियनवाला बाग, गांधी युग, रेडिओ युग, संयुक्त महाराष्ट्र, नेहरु, चीन व पाक युद्ध, इंदिरा गांधी, आणीबाणी, बोफोर्स प्रकरण, राजीव गांधी हत्या असा १८२५ ते १९९१ ह्या कालावधीतला इतिहास अण्णांनी उभा केला आहे. शेवटची पिढी बियर आणि सिगारेट घेऊन चर्चा करीत बसलेली ही दाखवली आहे. हे सारे लेखन त्यावर्षीच्या दिवाळी अंकाचे वैशिष्ट्य ठरले होते.


अण्णांचे व्यक्तिमत्व एका लेखात उभे करणे अशक्य आहे. त्यांचे 'कोकणची पाऊलवाट' हे ३२३ पानांचे आत्मचरित्र ज्यांनी वाचले आहे त्यांना त्याची थोडीफार कल्पना येऊ शकेल. एक अजातशत्रू, नैराश्याला कधीही जवळ फिरकू देणारा, सतत हसतमुख असणारा, इतरांच्या लहान-सहान कामांचेही कौतुक करणारा, नव्या कल्पना नव्या दिशांचे स्वागत करणारा असे अण्णांचे वर्णन मी करु शकेन. अण्णा आज असते तर १९९१ ते २००५ ह्या पंधरा वर्षांचा संवाद त्यांनी कसा लिहिला असता याचे कुतूहल कधीकधी माझ्या मनात जागे होते.

अण्णांच्या एक पुस्तकाचे शीर्षक आहे 'रेंगाळणारे सुगंध'. माझ्या आठवणींच्या लेखाला हेच शीर्षक द्यायचा मोह मला आवरला नाही. अण्णांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने ही सुगंधाची कुपी मी सहजपणे उघडू शकलो, त्यात रमू शकलो यातच सारे आले.

माधव शिरवळकर

(नागरिकवरुन साभार)

•••



# परिसर वार्ता

**१ ऑगस्ट २००५ रोजी मंडळाच्या वर्धापन दिनी प्राचार्य नायक सर यांनी सादर केलेला अहवाल**

**विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील ठळक घडामोडी :**

**शैक्षणिक वर्ष २००४ - २००५**

प्राचार्य श्री. सी. श्री. मुजुमदार दिनांक ३१.०५.२००४ रोजी आपल्या १८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले, आणि दि. १.०६.२००४ पासून श्री. दि. कृ. नायक यांनी प्राचार्यपदाची सूत्रे हाती घेतली.

दिनांक २२.०६.२००४ पासून प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेस सुरवात झाली. एकूण १९०० प्रवेश अर्जांचे वितरण झाले. त्यापैकी ८५० विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी आपले अर्ज सादर केले. यापैकी २९० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

दि. ६.०७.२००४ रोजी उन्हाळी परीक्षा, २००४ चा निकाल जाहीर झाला. प्रथम वर्षाचा निकाल ६९.१२%, द्वितीय वर्षाचा ७८.७०% व तृतीय वर्षाचा निकाल ८७.४३% लागला. कु. **श्रेयस झिंगरे हा तृतीय वर्षाचा, इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिमचा विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातून पहिला आला.**

दि. ६.०७.२००४ रोजी गुणवंत विद्यार्थ्यांचा तंत्रनिकेतनातर्फे सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे कु. श्रेयस झिंगरे याचा दि. ६.०७.२००४ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात गुणवत्ता प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

१९.०७.२००४ रोजी प्रथम वर्षाच्या मुलांना प्रास्ताविक भाषण देऊन कॉलेज सुरु झाले.

८.०८.२००४ ला "Pollution of Water bodies in Urban Areas" या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले होते. अखिल भारतीय तंत्र शिक्षण मंडळ (AICTE) कडून या चर्चासत्रासाठी ५००००/- रु. चे अनुदान मिळाले.

दि. ५.९.२००४ रोजी ज्या व्याख्यातांचा निकाल ९०% पेक्षा जास्त लागला आहे अशा ३५ व्याख्यातांचा शिक्षक दिनाच्या निमित्ताने सत्कार करण्यात आला.

इंजिनियर्स डे दि. १५.९.२००४ साजरा करण्यात आला. या दिवशी श्री. उदय निगुडकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

रोटरी क्लब ऑफ ठाणे, नॉर्थ एन्ड तर्फे दि. २०.१०.२००४ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. ह्या शिबिरात ५० विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी रक्तदान केले.

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन व रोटरी क्लब ऑफ ठाणे, नॉर्थ एन्ड यांच्या संयुक्त विद्यमाने तंत्रनिकेतनातील शिक्षकांसाठी "Management Skills Development" या विषयावर दि. २५.१०.२००४ ते ५.११.२००४ पर्यंत हिवाळी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. रोटरी क्लब ऑफ ठाणे, नॉर्थ एन्डचे अध्यक्ष डॉ. श्री. शेखर सुराडकर यांनी या कार्यशाळेचे उद्घाटन केले.

२०.११.२००४ ते १०.१२.२००४ या

कालावधीत हिवाळी परीक्षा २००४ घेण्यात आली.

२५.१२.२००४ ते ३१.१२.२००४ हा क्रिडा व सांस्कृतिक सप्ताह म्हणून साजरा करण्यात आला.

CSI Thane Chapter चे उद्घाटन डॉ. विजय बेडेकर, कार्याध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ यांनी दि. २२.०१.२००५ रोजी केले.

दि. २५.०१.२००५ रोजी ''पॉलिझिन'' या वार्षिकाचे प्रकाशन कु. आदिती सारंगधर यांच्या हस्ते करण्यात आले. या समारंभात डॉ. एस. सी. आगरकर यांच्या हस्ते शैक्षणिक, व कु. आदिती सारंगधर आणि लोकेश गुप्ते यांच्या हस्ते क्रिडा व सांस्कृतिक पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

हिवाळी परीक्षा २००४ चे निकाल २५.०१.२००५ रोजी जाहीर करण्यात आले.

२६.०१.२००५ रोजी संस्थेच्या माजी विद्यार्थी संघाचे संमेलन झाले.

श्री. दि. कृ. नायक व श्री. तुषार मोहिते-पाटील यांनी ISTE महाराष्ट्र व गोवा चॅप्टरनी दि. ४.०२.२००५ व ५.०२.२००५ रोजी आयोजित केलेल्या परिसंवादात आपले निबंध सादर केले.

MCA-CET परीक्षा व IIT GATE परीक्षा दि. १३.०२.२००५ रोजी तंत्रनिकेतनात घेण्यात आल्या.

तंत्रशिक्षण संचालनालयाचे, संचालक प्रो. न.बा. पासलकर यांनी दि. १४.०२.२००४ रोजी तंत्रनिकेतनाला सदिच्छा भेट दिली.

दोन दिवसांचे करियर मार्गदर्शनपर कार्यशाळा दि. २५ व २६ फेब्रुवारी, २००५ रोजी करण्यात आली. याचे उद्घाटन सुप्रसिध्द संगणक तज्ञ श्री. अच्युत गोडबोले यांनी केले. श्री. अनिरुध्द जोशी, सभासद, विद्या प्रसारक मंडळ व रोटरी क्लब ऑफ ठाणे, नॉर्थ एन्डचे श्री. रवि चंद्रन, यांनी संयुक्तपणे, प्राचार्यांनी शिफारस केलेल्या ३० गुणवंत विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. ४००/- ची शिष्यवृत्ती जाहीर केली.

दि. २१.०३.२००५ ते ४.०४.२००५ या कालावधीत प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आल्या.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त दि. १४.०४.२००५ रोजी डॉ. दीपक पाठक, संचालक, IIT School of Management यांचे भाषण झाले.

दि. १९.०४.२००५ ते १४.०५.२००५ या कालावधीत लेखी परीक्षा घेण्यात आल्या.

उन्हाळी परीक्षा २००५ चे निकाल २१.०६.२००५ रोजी जाहीर झाले. प्रथम वर्षाचा ७५.७८%, द्वितीय वर्षाचा ८२.११% व तृतीय वर्षाचा निकाल ९०.२४% लागला. तृतीय वर्षाचा विद्यार्थी कु. वैभव खेर याने ८७.५४% गुण मिळवून, इलेक्ट्रॉनिक्स विभागात राज्यात पहिला येण्याचा मान मिळवला.

दि. कृ. नायक
प्राचार्य

**मॅथेमॅटीक्स क्लब 'सिध्दान्त' चा उद्घाटन समारोह**

'बी. एन. बांदोडकर कॉलेज ऑफ सायन्स' मध्ये मंगळवार, ६ सप्टेंबर २००५ रोजी मॅथेमॅटीक्स क्लब 'सिध्दान्त' चा औपचारिक उद्घाटन समारोह पार पडला. प्रस्तुत उद्घाटनासाठी कॉलेजच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर उपस्थित होत्या. विविध शाखांमधील प्राध्यापक, विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारीही कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते.

'सिध्दान्त' बद्दल माहिती देताना, गणित विषय घेऊन तृतीय वर्षात शिकणाऱ्या सलिल सावरकरने आजवरच्या वाटचालीचा आलेख थोडक्यात मांडला. जानेवारी २००६ मध्ये आयोजिल्या जाणाऱ्या 'इंटरकॉलेजिएट् वर्कशॉप' ची ही माहिती त्याने श्रोतृसमुदायास दिली. "विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, शिक्षकांचे उत्तम मार्गदर्शन आणि इतर कर्मचारीवर्गाचे उपयुक्त साहाय्य ह्यामुळे आजवर जसे अनेक प्रकल्प 'सिध्दान्त' ने यशस्वीरीत्या हाताळले तसेच यापुढेही होत राहील" ह्या त्याच्या उद्गारांवर टाळ्यांचा कडकडाट झाला.

प्राचार्य डॉ. (सौ.) पेजावर ह्यांनी महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीचा परामर्श घेतला. प्राणिशास्त्र आणि वनस्पतिशास्त्र ह्यातील संशोधनात 'सांख्यिकी' विभागाच्या प्राध्यापकांकडून अमूल्य सहकार्य मिळत असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. "आपले महाविद्यालय हे संशोधनाचे लहानसे केंद्र न राहता विशाल आणि व्यापक स्वरूपाचे व्हावे" अशी इच्छा आणि "ते तसे होऊ शकते" असा आशावादही त्यांनी व्यक्त केला. आपल्या व्यस्त आणि व्यग्र दिनक्रमातूनही वेळ काढून त्यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेले छोटे-मोठे गणितीय प्रकल्प आवर्जून पाहिले.

विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हे ह्या समारोहाचे ठळक वैशिष्ट्य! वरीष्ठ महाविद्यालयात तीन्ही वर्षांतील विद्यार्थ्यांनी गणित विषयाला वाहिलेले प्रकल्प तयार केले होते. 'वैदिक मॅथेमॅटीक्स', 'टॉवर ऑफ हॅनॉई', 'कोडींग थिअरी', 'इनिक्वालिटीज्' असे अनेक विषय विद्यार्थ्यांनी समर्थपणे हाताळले होते. मेंदूला आव्हान देणारे काही मजेशीर कूटप्रश्नही होते. आपापले प्रकल्प समजावून सांगताना तसेच इतरांकडून समजून घेताना विद्यार्थीवर्ग रममाण झाला होता. 'गणित ही केवळ शास्त्रांचीच नव्हे तर सौंदर्याचीही जननी आहे' हेच ह्या समारोहातून दिसून आले. संध्याकाळी साडेचार वाजता सदर कार्यक्रमाची सांगता झाली

-संकलीत

•••


दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

प्रतिक्रियांसाठी
दूरध्वनी
☎ २५४२ ६२७०

## विद्या प्रसारक मंडळ
## सौ. ए. के. जोशी इंग्लिश मिडियम स्कूल, ठाणे.

विविध संस्थांनी आयोजित केलेल्या स्पर्धांमध्ये आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यांना मिळालेले यश खालील प्रमाणे -

| संस्थेचे नाव | स्पर्धेचे नाव | विद्यार्थ्यांचे नाव | बक्षिस |
|---|---|---|---|
| संस्कृती विविधा | तबला | गौरव महाशब्दे | 2nd Prize |
| | Vocal Singing | आदित्य कानविंदे | 3rd Prize |
| संस्कार भारती | Vocal (Singing) | मधुरा जोशी | 2nd Prize |
| विश्व हिंदू परिषद | आरती स्पर्धा | Group of students | 2nd Prize |

२) चिन्मय पोटे इ. ६ वी ब याने खालील पारितोषिके मिळवली -

(i) IX Badokan Karate Maharashtra State Selection Championship - 2005 -
- Gold Medal in Long Weapons event
- Gold Medal in Kata event
- Gold Medal in Kumite event
- Silver Medal in Short Weapon event

(ii) Received Male kala Grand Championship Trophy.